सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026


❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ७३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. ९ एप्रिल २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## डोनाल्ड ट्रम्प जगाला आणखी एक धक्का देणार औषधांवर टॅरिफ लावण्याच्या तयारीत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९वाशिंग्टन**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सुरू केलेल्या टॅरिफ (आयात शुल्क) वॉरमुळे जगभरातील अनेक देशांचे शेअर बाजार गडगडले आहेत. चीनवर अमेरिकेने सर्वाधिक आयात शुल्क लादलं आहे. त्याच्या प्रत्युत्तरात चीनने अमेरिकन वस्तूंवर आणखी ३४ टक्के आयात शुल्क लावत असल्याची घोषणा केली. त्यानंतर आता डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनी मालावर १०४ टक्के आयात शुल्क लावलं आहे. तसेच अमेरिकेने भारतीय मालावर २७ टक्के आयात शुल्क लावलं आहे. ट्रम्प विविध देशांवर आयात शुल्क लावून थांबले नाहीत. आता त्यांनी फार्मा उत्पादनावर (औषधे आणि वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित इतर उत्पादने) मोठं टॅरिफ लावणार असल्याची घोषणा केली आहे. ट्रम्प यांच्या या घोषणेने अनेक देशांचे धाबे दणाणले आहेत.

नॅशनल रिपब्लिकल काँग्रेसनल कमिटीच्या एका बैठकीला संबोधित करताना डोनाल्ड ट्रम्प यांनी औषध उत्पादनांवरील टॅरिफबाबतचं वक्तव्य केलं. आपला निर्णय पटवून देताना ते म्हणाले, आपल्या सरकारचं हे पाऊल औषध उत्पादकांना त्यांचे व्यवसाय पुन्हा



अमेरिकेत आणण्यास प्रोत्साहित करण्यासाठी महत्त्वाचं ठरेल. या कंपन्या अमेरिकेत उत्पादन करणार नसतील तर त्यांना भरमसाठ उत्पादन शुल्क भरावं लागेल.

**भारतावर काय परिणाम होणार?**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी औषधनिर्मिती करणाऱ्या कंपन्यांवर आयात शुल्क लागू केलं तर त्याचा भारतावरही परिणाम होईल. अमेरिकेला औषधपुरवठा करणाऱ्या देशांमधील भारत हा सर्वात मोठा पुरवठादार देश आहे. २०२४ मध्ये भारताने तब्बल १२.७२ बिलियन अमेरिकन डॉलर्स किंमतीच्या औषधांची निर्यात केली आहे. त्यापैकी ८.७ बिलियन डॉलर्स किंमतीची औषधे एकट्या अमेरिकेला पाठवण्यात आली आहेत. दुसऱ्या बाजूला भारत अमेरिकेकडून केवळ ८०० मिलियन डॉलर्स किंमतीची औषधे आयात करतो. त्यामुळे अमेरिकेने औषधांवर आयात शुल्क लादल्यास भारतावर त्याचे गंभीर परिणाम होतील.अमेरिकेतून भारतात आयात केल्या जाणाऱ्या औषधांवर भारत १०.९१ टक्के आयात शुल्क आकारतो. मात्र अमेरिका भारताकडून आयात केल्या जाणाऱ्या औषधांवर कोणत्याही प्रकारचं आयात शुल्क आकारत नाही. याआधी डोनाल्ड ट्रम्प यांनी विविध देशांवर आयात शुल्क लावलं तेव्हा त्यांनी औषधे व इतर फार्मा उत्पादनांना त्यातून वगळलं होतं. मात्र, आता ट्रम्प औषधे व फार्मा उत्पादनांवर आयात शुल्क लावण्याच्या तयारीत आहेत. अमेरिकेतील माध्यमांनी दावा केला आहे की ट्रम्प आजच याबाबतची मोठी घोषणा करू शकतात.

## पक्षाची कामे करायची नसतील तर निवृत्ती घ्या खरगेंनी जाहीर सभेत काँग्रेस नेत्यांना खडसावले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९ अहमदाबाद**

गुजरातमध्येकाँग्रेसचे राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. य कार्यक्रमात पक्षाच्या प्रमुखांसह सर्व ज्येष्ट नेते सहभागी झाले आहेत. यावेळी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पक्षाच्या सर्व नेत्यांना कडक संदेश दिला आहे. पक्षाची कामे न करणारे अथवा दिलेली जबाबदारी योग्यरित्या न पार पाडणाऱ्यांनी निवृत्ती घ्यावी, असे खरगेंनी स्पष्टपणे सांगितले.



अहमदाबाद येथे साबरमती नदीच्या काठावर काँग्रेस अधिवेशनाला संबोधित करताना खरगे म्हणाले, संघटनेच्या जडणघडणीत जिल्हाध्यक्षांची भूमिका महत्त्वाची असणार आहे. म्हणूनच त्यांची नियुक्ती एआयसीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार काटेकोरपणे आणि निष्पक्षपणे केली पाहिजे. जिल्हाध्यक्षांनी नियुक्ती झाल्यापासून एका वर्षाच्या आत सर्वोत्तम लोकांचा समावेश करून बूथ कमिटी, मंडल कमिटी, ब्लॉक कमिटी आणि जिल्हा कमिटी तयार करावी. यामध्ये कोणताही पक्षपात नसावा, असे त्यांनी सांगितले.

खरगे पुढे म्हणतात, आम्ही देशभरातील जिल्हाध्यक्षांच्या तीन बैठकाही बोलावल्या. मी आणि राहुल गांधी यांनी त्यांच्याशी बोललो आणि त्यांचे मत जाणून घेतले. भविष्यात आम्ही निवडणुकीसाठी उमेदवार निवड प्रक्रियेत जिल्हाध्यक्षांना सहभागी करून घेणार आहोत. मला सर्वांना असेही सांगायचे आहे की, जे पक्षाच्या कामात मदत करत नाहीत, दिलेल्या जबाबदाऱ्या पार पाडत नाहीत, त्यांनी निवृत्त व्हावे.


आपण पुन्हा एकदा भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढत आहोत. स्वातंत्र्याच्या या दुसऱ्या लढाईत पुन्हा शत्रू अन्याय, असमानता, भेदभाव, गरिबी आणि सांप्रदायिकता आहेत. फरक एवढाच आहे की पूर्वी परदेशी लोक अन्याय, गरिबी आणि असमानतेला प्रोत्साहन देत होते, आता आपले स्वतःचे सरकार ते करत आहे. पूर्वी परदेशी लोक जातीयवादाचा फायदा घेत असत, आज आपलेच सरकार त्याचा फायदा घेत आहे. पण आपण ही लढाई देखील जिंकू, असा दावाही त्यांनी यावेळी केला.

## शांत झोपेसाठी पाटील पुन्हा भाजपात? बावनकुळेंच्या भेटीनंतर रंगली चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९मुंबई**

आठवतंय नं पाटलांचं हे गाजलेलं वक्तव्य. म्हणूनच की काय त्यावेळी राजकीय पटलावर ज्या काही नाट्यमय घडामोडी घडल्या त्यात काँग्रेसमधून भाजपत प्रवेश केलेल्या हर्षवर्धन पाटलांचं चौकशीपासून मुक्ती मिळाल्याने शांत झोप लागते, हे वक्तव्य आत्ता आठवण्याच कारण म्हणजे त्यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंची घेतलेली भेट. हर्षवर्धन पाटील हे सध्या शरद पवारांच्या राष्ट्रवादीत आहेत. त्यामुळे या भेटीची चर्चा रंगल्यानंतर या चर्चा पाटलांनी फेटाळून लावल्यात.

हर्षवर्धन पाटलांनी ऐन विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर पवारांची तुतारी फुंकली. मात्र इंदापूरमधून दत्तात्रय भरणेंनी पाटलांचा पराभव केला. त्यानंतर



हर्षवर्धन पाटील पवारांच्या राष्ट्रवादीत अस्वस्थ असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत.त्यापार्श्वभुमीवर हर्षवर्धन पाटलांनी चंद्रशेखर बावनकुळेंची भेट घेतल्याने पुन्हा पक्षांतराच्या चर्चा रंगल्या आहेत.

राजकारणात प्रवेश केल्यापासून नेहमी सत्तेच्या सावलीला असलेले हर्षवर्धन पाटील सत्तेबाहेर असल्याने अस्वस्थ असल्याचं म्हटलं जातंय.दुसरीकडे भाजपची साथ सोडल्यानंतरही भाजपने सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्षपद हर्षवर्धन पाटलांकडे कायम ठेवलं.त्यामुळे हर्षवर्धन पाटील शांत झोप लागण्यासाठी भाजपमध्ये प्रवेश करणार की शिंदे गटात सहभागी होऊन पक्षांतराचं वर्तुळ पूर्ण करणार? याकडे लक्ष लागलंय.

## दुबईत जाऊन लग्न कर, धनंजय मुंडेंनी दिली ५० कोटींची ऑफर; करूणा मुंडेंचा खळबळजनक दावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९बीड**

करूणा मुंडे यांनी परळीचे आमदार धनंजय मुंडे यांच्यावर गंभीर आरोप केलेत. दुबईत जाऊन लग्न करण्यासाठी ५० करोडची ऑफर दिल्याचा खळबळजनक दावा करूणा मुंडे यांनी केलाय. त्यांनी म्हटलंय की, माझ्या नवऱ्याच्या राजकीय कारकिर्दीचं वाटोळं या गुंडागँगनी केलंय. या लोकांनी मी सोडणार नाही. यांच्याशी माझं काहीच देणंघेणं नाहीये. राज घनवट, पुरुषोत्तम केंद्रे, तेजस ठक्कर यांना मी सोडणार नाही. यांनी नाचणाऱ्यांना घरात बसवलं अन् पत्नीला रस्त्यावर आणलं. आज माझ्यासंदर्भात चुकीचं पसरवत आहे. माझा नवरा तीन वर्षापासून माझ्योसोबत नाही. आज मी कायद्याने इतर कोणाशी लग्न करण्यास मला परवानगी आहे. त्यामुळं मला जेव्हा काही करायचं असेल तेव्हा मी पूर्ण महाराष्ट्राला सांगेल.



मला दुसरं लग्न किंवा अफेअर करायचं असेल तर सांगून करेन.

माझ्या नवऱ्याचं राजकीय करिअरचं वाटोळं याच दलालांनी केलंय. माझ्या नवऱ्याकडून हजारो करोंडोंच्या प्रॉपर्टीवर सही करण्यासाठी हे लोक करत आहे. हजारो तक्रारी दिल्या आहेत. पण सिस्टिमने बांगड्या घातल्या आहे. मला हेच सगळं करायचं असतं, तर मला पन्नास करोडची ऑफर होती. दुबईत जावून आरामशीर केलं असतं. माझ्याकडे वकिलाची रेकॉर्डिंग आहे. वकिल आणि धनंजय मुंडे यांचे ते रेकॉर्डिंग लवकरच मी फेसबुकवर टाकणार आहे. तु खूप सुंदर दिसतेस, दुबईत जावून लग्न कर म्हणून. लवकरच मी एकटी परळीत राहायला जाणार आहे.मी दलाली खाण्याचं काम करत नाही. हे लोक अतिशय नीच मानसिकतेचे आहेत. माझ्या पाठीमागे कोणीच नाही, उद्या जर मला काही झाले तर यांना सोडू नका असं करूणा मुंडे यांनी महाराष्ट्राच्या जनतेला केलंय.

## पंढरपूरहून वारी निघणार, ती थेट लंडनला जाणार तब्बल २२ देशातून प्रवास करणार



**विदर्भ प्रजासत्ताक दि.९नागपूर**

अवघ्या देशभरात सुप्रसिद्ध असलेले पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर आणि तेथील वारीची, संत परंपरेची गाथा आता जगभरात पोहोचणार असून काही वर्षात लंडन येथे श्री विठ्ठल रुक्मिणीचे भव्यदिव्य मंदिर साकारण्यात येणार आहे. विष्णू मनोहर आणि व्यवस्थापन तज्ज्ञ व एलआयटी विद्यापीठाचे प्रधान सल्लागार मोहन पांडे हे नागपूरकर या मंदिर समितीचे सदस्य व भारतातील समन्वयक आहेत.

याबाबत माहिती देताना शेफ विष्णू मनोहर म्हणाले, अमेरिका, यूरोप, लंडन येथे इस्कॉन, अक्षरधाम, बालाजी तसेच राजस्थान येथील देवतांची मंदिरे अशी अनेक भारतीय मंदिरे आहेत. मात्र, एवढी जुनी संत साहित्य परंपरा असलेले पंढरपूर येथील विठ्ठल-रखुमाईचे मंदिर तिकडे नाही. ही कमतरता भरून काढण्यासाठी लंडन येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर टीम प्रयत्नशील असून वारीला सातासमुद्रापार नेण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. खरे तर दिंडीतील पादुका विमानातून लंडन येथे जाऊ शकतात. पण समर्पण म्हणून सुखी संसाराची वाट सोडून लाखो भाविक पायी वारी करतात. ही बाब ध्यानात घेऊन वारीचा योजना करण्यात आली असून सुमारे २२ देशातून १८००० किलोमीटरचा ही दिंडी प्रवास करणार आहे आणि भक्तीची परंपरा भारताबाहेर पोहोचवणार आहे.

## फडणवीसांना नागपुरात मोठं गिफ्ट मिळणार? भाजपचं टार्गेट ठरलं, तयारीही जोमात...

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९नागपूर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री झाल्याने नागपूरमधील भाजपच्या कार्यकर्त्यांना यावेळी नागपूर महापालिकेत सर्वाधिक नगरसेवक निवडून आणत ऐतिहासिक विजयाची नोंद करायची आहे. याकरिता अतिशय बारकाईने नियोजन केले जात आहे. पक्षांतर्गत रचनेत बदल केला जाणार आहे. त्यानुसार २० मंडळ समित्या स्थापन करून त्यांच्याकडे प्रत्येकी दोन प्रभागांची जबाबदारी सोपविली जाणार आहे.



नागपूर महापालिका पंधरा वर्षांपासून भाजपच्या ताब्यात आहे. दोन वेळा भाजपला अपक्ष नगरसेवकांच्या कुबड्या घेऊन सत्ता आणावी लागली होती. मात्र, मागच्यावेळी भाजपचे तब्बल १०८ नगरसेवक निवडून आले होते. सध्या नागपूर महापालिकेत १५१ नगरसेवक आहेत. यापैकी काँग्रेस २८, बसपा १०, राष्ट्रवादी एक, शिवसेना दोन आणि दोन अपक्ष नगरसेवक निवडून आले होते.

भाजपने आता दीडशे नगरसेवक निवडून आणण्याचा संकल्प केला आहे. महापालिकेच्या निवडणुकीत विरोधकांना जागाच मिळू नये असा प्रयत्न केला जात आहे. याकरिता संघटनेची काटेकोर बांधणी केली जात आहे. भाजपच्या संघटनेनुसार विधानसभा निहाय मंडळ आहेत. त्यानुसार नागपूर शहरात सहा मंडळे आहे.महापालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपने एकूण २० मंडळ समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. एक मंडळावर दोन प्रभागांची जबाबदारी सोपविली जाणार आहे. मंडळ समितीत दोन २ महामंत्री, एक संपर्क प्रमुख, एक कोषाध्यक्षाचा समावेश राहणार आहे. प्रत्येक मंडळ समिती व त्या अंतर्गत येणाऱ्या कार्यकर्त्यांना सरासरी १०० बुथ सांभाळावे लागणार आहेत. महापालिकेत उमेदवारी वाटप करताना मंडळ समितीच्या पदाधिकाऱ्यांचाही विचार केला जाणार आहे.

नव्याने प्रभाग रचनेचा आणि नगरसेवकांची संख्या वाढवण्याचा अधिकारही राज्य शासनाला राहणार आहे. त्यामुळे नागपूर पालिकेतील नगरसेवकांचा आकडा १५१ च्या पुढे जाऊ शकतो.

## तिसरी चूक झाली तर याद राखा, मंत्रिपद जाईल! राष्ट्रवादीच्या बैठकीत अजित पवारांचा सज्जड दम

**विदर्भ प्रजसत्ताक दि.९मुंबई**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची रणनीती ठरली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार सोमवार, मंगळवार, बुधवार मुंबईत शासकीय कामकाज पाहणार असल्याची माहिती समोर आली आहे. तर उरलेले ४ दिवस अजित पवार महाराष्ट्र दौरा करणार आहेत.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मंत्री, विधान परिषद आमदार यांना देखील राज्यभरातील दौऱ्यांचं शेड्युअल तयार करून तत्काळ पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना कळवण्याचे आदेश अजित पवारांकडून देण्यात आले आहेत. सदर दौऱ्यांच्या दरम्यान पदाधिकारी मेळावे, सदस्य नोंदणी, बूथ बांधणी आणि संघटन वाढवण्याच्या सूचना देखील अजित पवारांनी दिल्या आहेत. मंगळवारी (८ एप्रिल) पार पडलेल्या आमदार पदाधिकारी बैठकीत अजित पवारांनी या सूचना दिल्या. तसेच वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या मंत्र्यांना देखील एकदा दोनदा चूक झाली, तर समजून घेऊ...मात्र तिसऱ्या वेळी माफी नाही तर मंत्रिपद बदलू असा सज्जड दम देखील अजित पवारांनी या बैठकीत दिला आहे.



## संपादकीय ......

# घुसखोरांची धर्मशाळा!

भारत ही घुसखोरांची राजधानी बनली असून, घुसखोरांची नाकेबंदी करण्याचा इशारा केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी यावरील नवा कायदा करताना संसदेत दिला आहे. पश्चिम बंगाल सरकारच्या असहकार्यामुळे आणि धोरण विसंगतीमुळे घुसखोरांना पायबंद घालण्यात सरकारला अपयश आले असून कायद्यात सुधारणा केल्यानंतर तरी ठोस उपाययोजना केल्या जातील, अशी आशा आहे. घुसखोरीने नवे आर्थिक, सामाजिक आणि देशाच्या सुरक्षिततेचे गंभीर प्रश्न निर्माण होत असून ती रोखण्याचे मोठे आव्हान केंद्र आणि राज्य सरकारांसमोर आहे.

देशाच्या विकासात योगदान देणार्या विदेशी लोकांचे स्वागतच केले जाईल; मात्र सुरक्षेला धोका ठरणार्यांना येथे राहू दिले जाणार नाही. भारत म्हणजे धर्मशाळा नव्हे. त्यांची गय करणार नाही, असा इशारा देत केंद्रीय गृहमंत्री शहा यांनी घुसखोरांना वेसण घालण्यासाठी कठोर पावले उचलण्याचे संकेत संसदेत दिले आहेत. त्याचाच भाग असलेल्या स्थलांतर आणि विदेशी नागरिकांसंदर्भातील विधेयक संसदेने मंजूर केले. त्याने भारतात प्रवेशासाठीचे कायदे आणखी कडक करण्यात आले. हा इशारा देताना गृहमंत्र्यांनी भारत ही आजवर खुसखोरांची धर्मशाळाच झाल्याची कबुलीच दिली आहे. केंद्रातील सरकारचा तिसरा कार्यकाल सुरू असताना देशाच्या महत्त्वपूर्ण आणि संवेदनशील सीमेची ही स्थिती विदारक वास्तवाकडे दिशानिर्देश करणारी आहे. कबरी आणि घिबलीच्या गदारोळात देशाच्या गृहमंत्र्यांचे हे वक्तव्य तितकेसे गांभीर्याने घेतले गेलेले दिसत नाही; मात्र देशात अनेक ठिकाणी आजवर अशा धर्मशाळा उभ्या केल्या गेल्या. या धर्मशाळा देशाची अर्थव्यवस्था पोखरतात, पायाभूत सोयी-सुविधा, शहरांवरील लोकसंख्येचा बोजा वाढवतात आणि देशाच्या सुरक्षेला थेट धोका पोहोचवतात. घुसखोरांना पायबंद घालणारा हा नवा आणि कडक कायदा करण्यास इतकी वर्षे जावी लागली. पश्चिम बंगाल विधानसभेच्या निवडणुका जवळ आल्या आहेत, या पार्श्वभूमीवर का असेना, नवा कायदा केला गेला, हे विशेष!गृहमंत्री शहा यांनी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यावर घुसखोरीला मदत केल्याचा गंभीर आरोप केला. तो त्यांच्या अधिक राजकीय सोयीचा असला, तरी या आरोपाला मोठा वस्तुस्थितीचा आधारही आहे. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. घुसखोरीसारख्या राष्ट्रीय प्रश्नावर केंद्राला राज्याचे सहकार्य नाही. राज्यातील लांगुलचालन आणि मतपेढीच्या राजकारणावरून घुसखोरीला पाठबळ दिले जाते. पश्चिम बंगालसह आसाम, मिझोराम, मेघालय, त्रिपुरातून होणार्या बांगलादेशींचे तसेच म्यानमारमधील रोहिंग्यांचे घुसखोरीचे पश्चिम बंगाल हे प्रवेशद्वार बनले आहे. स्वातंत्र्यापासून आणि विशेषत: बांगला देश निर्मितीनंतर या स्थलांतराला वेग आला. देशभरात ५ कोटींवर आणि महाराष्ट्रात ५० लाखांवर असे घुसखोर असल्याची आधारभूत आकडेवारी सांगते. घुसखोरांनी पश्चिम बंगाल केव्हाच पोखरले. मतपेटीच्या आणि त्यातून येणार्या सत्तेच्या राजकारणासाठी राजकीय पक्ष या घुसखोरांना कसा प्रवेश आणि संरक्षण देतात, देशाच्या सुरक्षेशी कसा खेळ मांडतात, याचे हे ठळक उदाहरण. राज्याच्या काही भागांची ओळख 'मिनी बांगलादेश' झाली आहे. राज्यातील ९ जिल्हे मुस्लीम आणि बांगला देशी बहुल बनले आहेत. याहून गंभीर स्थिती आसामची आहे. झारखंडचे चित्रही बदलते आहे. लाखोंच्या संख्येने वसवलेल्या वस्त्या, त्यांना दिले जाणारे नागरिकत्वाचे लाभ आणि सुविधा, त्यांच्याकडील बनावट आधार कार्ड, पॅन कार्ड, रेशन कार्ड, बांगला देशच्या सीमावर्ती भागात चोरट्या मार्गाने होणारा रेशन धान्यपुरवठा या सार्याच बाबी चक्रावून टाकणार्या आहेत.

भारत-बांगला देश सीमा आजही बंदिस्त नाही. दोन हजार किलोमीटरपैकी ४५० किलोमीटर सीमेला कुंपण घालण्याचे काम केंद्र आणि राज्यातील राजकीय संघर्षात अडले आहे. तृणमूल काँग्रेस सरकारच्या मवाळ धोरणांमुळे सीमेला कुंपण घालता आलेले नाही, असा आरोप गृहमंत्री शहा यांनी केला आहे. बांगला देशींना भारतात आणण्याचे आणि कायदेशीर अधिकार बेकायदा मार्गाने मिळवून देण्याचे राजकीय पक्ष पुरस्कृत मोठे रॅकेट कार्यरत आहे. काँग्रेस आणि डाव्या पक्षांच्या ३४ वर्षांच्या राजवटीत हे लोंढेच्या लोंढे भारतात आले आणि स्थिरावले. मतपेढी मजबूत केली गेली. केवळ पश्चिम बंगालच नव्हे, तर आसाम, त्रिपुरा, बिहार, झारखंड या राज्यांच्या राजकारणाची दिशा ठरवण्याइतका प्रभाव या घटकांनी ठेवला. कालबाह्य कायदे बदलून ते कालसापेक्ष करण्याची गरज होतीच. ब्रिटिशकाळात स्थलांतर व विदेशी नागरिकांसंदर्भात १९२०, १९३९, १९४६ अशी तीन विधेयके संमत केली गेली होती; पण सारेच खापर कायद्यांवर फोडून चालणार नाही. ते ज्यांनी वापरायचे आहेत, त्या यंत्रणांनी अधिकार आणि जबाबदारीचा बाजार केला. विशेष म्हणजे, सीमा सुरक्षा दलातील काही भ्रष्ट यंत्रणेला हाताशी धरून ही घुसखोरी होत असल्याचा आरोप मुख्यमंत्री बॅनर्जी यांनी केल्याने या प्रश्नाकडे अधिक लक्ष वेधले गेले. त्यांच्या या आरोपांची निष्पक्ष चौकशी होते का, पाहावे लागेल.

घुसखोर भारताकडे आकर्षित का झाले आहेत, याची कारणेही तपासली पाहिजेत. त्या प्रत्येकाकडे केवळ गुन्हेगार म्हणून पाहणे अमानवी ठरेल. बांगला देशने अपयश लपवण्यासाठी या स्थलांतरितांना प्रोत्साहनाचे धोरण ठेवले. दारिद्र्य, वाढती लोकसंख्या आणि आरोग्याचे हाताबाहेर गेलेले प्रश्न यामुळे दोनवेळच्या घासासाठी हे लोक भारतात येतात आणि आणले जातात. त्यांना भारतात आणणार्या आणि देशात इप्सितस्थळी पोहोचवणार्या दलालांचे, सरकारी अधिकार्यांचे रॅकेट त्यासाठी काम करते. आज दिल्ली, लखनौ, पाटणा, कोलकाता, मुंबई या शहरांत त्यांच्या वस्त्या तयार झाल्या आहेत. पुणे, सांगली, रत्नागिरीसारख्या शहरांत पोलिसांच्या शोधमोहिमेत अनेक घुसखोर हाती लागले. गोवा, कर्नाटकातही स्थिती वेगळी नाही. हे हिमनगाचे टोक असून देशाच्या कानाकोपर्यांत पसरलेल्या या घुसखोरांना शोधण्याचे मोठे आव्हान पोलिस यंत्रणांसमोर आहे. या खुलेआम आणि राजकीय पक्ष 'पुरस्कृत' स्थलांतराकडे दुर्लक्ष केले गेले. भारतात प्रवेश मिळवणे आणि वस्त्या बनवणे आजही सोपे आहे, हे वास्तव अस्वस्थ करणारे आहे. सीमेला पाडलेली ही छिद्रे नव्या कायद्यामुळे आता तरी बंद होतील!

# मेळघाट : पाण्यासाठी वण वण

प्रसंग पहा किती बिकट आहे प्रश्न महिलांच्या सन्मानाचा आहेएकीकडे आपण भल्या मोठमोठया सुधारण्याच्या गप्पा मारतो मारतो ना आणि दुसरीकडे पहा गंभीर आणि चिंताजनक प्रसंग नेहमीच संवेदनशील मनाला सतावतो आहे.गाव सोडून ही विहीर जवळपास एक किलोमीटर अंतरावरची असेल ही जलसंजीवनी या पाणीटंचाईच्या दिवसात या परिसरातील लोकांसाठी आज वरदान ठरली आहे. महिलांना पाण्याने भरून दोन डोक्यावर एक कडेवर घेऊन घराकडे येताना डोंगर दर्यातून चढ उतारावरून पाण्याच्या आशेनं घराच्या दिशेनं यावं लागत.दुर्गम भाग असल्याने प्रसंगी अचानक हिंस्त्र पशुचा हल्ला होण्याची दाट शक्यता आहे आणि त्यातच पूर्ण दिवस एखाद्या घराच्या करत्या महिलेचा पाणी कसं मिळवायचं? कुठून आणायचं? याचे नियोजन करता करता आयुष्य निघून जाते की काय? असं झालं आहे काहींचं तर रोजगाराच्या सोबत पाण्याच्या शोधात पूर्ण आयुष्य खर्च होते की काय हाही विचार करणं गरजेचं आहे पाणी शुद्ध की अशुद्ध हे ठरवायला अशा जीव घेणाऱ्या पाणीटंचाईत वेळ कुठे आहे? कारण हजारो गुरं मालकांसहित हेटी करून पठारावर चारा पाण्याच्या शोधात ऊन वारा पाऊस चिरत निघून गेली असली तरी इकडे प्रत्येकाच्याअंगणात पाच दहा तहानलेली गुरं पाण्यासाठी गोठ्यात हंबरडा फोडत आहे .

युद्ध पातळीवर पाच सात फुटाचा घेर असलेल्या विहिरीवर म्हातारी घर राखण करीत असताना लहान मुलं मुली युवक युवती आणि महिला एकत्रित हात झेलनीने फार मोठ्या कष्टाने पाणी काढत आहे. यातलेच एक शाळकरी मूल विहिरीत डोकावून आपलं जीवनभविष्य शोधत आहे. शहरातल्या शाळेत एक-दोन वर्ग शिकलेली एक मुलगी या खोल विहिरीतून पाणी कसं काढावं या विचाराने उभी आहे. त्या गर्दीतला एक तरुण ज्याला झपझप वेगाने पाणी काढण्याचं तंत्रज्ञान अवगत आहे जीवनात पुण्याचं काम होऊन जाऊ द्या म्हणून इतरांना मदत करीत आहे त्यापैकी एक तरुण या विहिरीपर्यंतचा आमचा प्रवास कसा म्हणून आपबितीची कथा सांगताना दिसत आहे . हे सगळं रहाटगाडगं या विहिरीत पाणी असेपर्यंतच सुरू राहील नंतर पाण्यासाठी भटकंती आणि त्यातूनच निर्माण होणारी शोध मोहीम याहीपेक्षा दाट जंगलात दुसरी विहीर पानवठा किंवा तलावाच्या शोधात मंडळी पुन्हा निघणार आहे. पाणी ही चौथी मूलभूत गरज या मेळघाटमध्ये प्रशासनासमोर निर्माण झालेली आहे आज पर्यंत अन्न वस्त्र निवारा ह्या मूलभूत गरजा जाहीर आहेत त्या पूर्ण करता करता प्रशासनाच्या नाकीनऊ आले आहे अगदी सहज आणि सोपी पूर्ण होईल अशी त्यासोबत आता चौथी गरज प्रशासनाला काही करून युद्ध पातळीवर या उन्हाळ्याच्या दिवसात या जनतेला जिवंत ठेवण्यासाठी आणि महिलांची वणवण थांबविण्यासाठी तेवढीच सन्मानासाठी पण त्वरित नियोजन करून ज्या मेळघाटने पठाराला भरपूर पाणी दिले आणि देत आहे आणि भविष्यात पण देत राहील यांच्या प्रतिकृतज्ञता म्हणून वाहून गेलेले पण आज धरणांच्या माध्यमातून साठवलेले आहे ते पाणी उलट परत नेऊन त्यांच्यापर्यंत परत नेण्याचं काम करताना एक निकराची लढाई म्हणून प्रशासनाला करावयाची आहे. आपल्याला चंद्रावर जाता येते.... समुद्रातून रस्ता करता येतो.मोठमोठ्या पहाडातून बोगदे करून आरपार महामार्गाचे जाळे संपूर्ण देशभर विणता येते. तर आपल्या भन्नाट कामाचा आवाका पाहून आणि प्रचंड निधीचे नियोजन असताना मेळघाट मधल्या लोकांना पाणी हे चुटकीसरशी पूर्ण करणारी प्रशासनासाठी लहानशी गोष्ट आहे प्रशासनाने स्वत:आपणच या पाणी संकटात आहोत आणि ही टंचाई भोगत आहोत असा विचार करून आपण यांच्या ठिकाणी असतो तर काय काय घडलं असतं याचं चित्र डोळ्यासमोर उभा करून या संवेदनशील आणि ज्वलंत समस्येला पूर्णविराम द्यावा ही सर्वांना भावस्पर्शी अगदी हृदयाच्या कप्प्यापासून कळकळीची विनंती........

**माजी प्राचार्य सुखदेव पवार**
जिल्हाध्यक्ष भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा,जिल्हा अमरावती ग्रामीण.




## थकवा, PCOS, केसगळतीमुळे त्रस्त आहात ? तर मग नियमित खा 'हे' फळ

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक** - ३० ते ४० वयानंतर महिलांच्या शरीरात अनेक प्रकारच्या शारीरिक समस्या वाढू लागतात. या समस्यांमध्ये प्रामुख्याने हार्मोनल असंतुलन, थकवा, ॲनिमिया, केसगळती, त्वचा विकार आणि मासिक पाळीशी संबंधित अडचणी यांचा समावेश होतो. बहुतांश महिलांमध्ये या त्रासांचे मूळ कारण म्हणजे शरीरातील आयर्न आणि रक्तातील कमतरता हे आहे.

घरगुती जबाबदाऱ्या सांभाळताना अनेक महिला स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. वेळेवर जेवण न होणे, पोषणयुक्त आहाराची कमतरता यामुळे शरीरात अनेक प्रकारचे त्रास सुरू होतात. अशा वेळी एक साधं पण प्रभावी फळ डाळिंब महिलांसाठी वरदान ठरू शकतं.

**आयुर्वेदानुसार डाळिंब हे एक प्रभावी फळ**- डाळिंब हे एक असं फळ आहे जे संपूर्ण शरीरासाठी उपयुक्त ठरतं. आयुर्वेदानुसार, डाळिंब शरीराच्या त्वचा, केस, पचन, प्रजनन, मेंदू आणि हृदय यांसारख्या महत्त्वाच्या घटकांवर प्रभावी ठरते

**डाळिंब खाण्याचे आरोग्यदायी फायदे:**

**फर्टिलिटी सुधारते:**- डाळिंब खाल्ल्याने अंडाशयातील बीजगुणवत्ता सुधारते. इस्ट्रोजेनचे प्रमाण संतुलित राहते.

**PCOS आणि वंध्यत्वावर नियंत्रण:**
हार्मोनल बॅलन्स टिकवून ठेवते. त्यामुळे झउजड, वंध्यत्व, केसगळती आणि चेहऱ्यावरील मुरूम यांसारख्या समस्या दूर राहतात.

**रक्ताची कमतरता दूर करते:**
डाळिंबात भरपूर प्रमाणात आयर्न असतं. त्यामुळे ॲनिमिया कमी होतो.

**त्वचा आणि केसांच्या आरोग्यासाठी फायदेशीर:**
अँटीऑक्सिडंट्समुळे त्वचा तेजस्वी होते आणि केस गळती कमी होते.

**हृदयासाठी लाभदायक:**डाळिंबाचे



नियमित सेवन केल्याने कोलेस्ट्रॉल नियंत्रणात राहतो आणि हृदय मजबूत राहतं.

**पचनतंत्र सुधारते:**
फायबर्समुळे बद्धकोष्ठता कमी होते आणि पचनक्रिया सुधारते.

**मेंदूच्या कार्यक्षमतेसाठी उपयुक्त:**
मेंदूला ऊर्जा मिळते आणि एकाग्रता वाढते.

**पित्ताशयातील खड्यांपासून संरक्षण:**
नियमित सेवन केल्यास गॅलस्टोन म्हणजेच पित्ताशयातील खडे होण्याची शक्यता कमी होते.

**मेनोपॉजनंतरही शरीर सक्रिय:**
मेनोपॉजनंतर होणाऱ्या हार्मोनल बदलांमध्येही डाळिंब उपयुक्त ठरतं.

डाळिंब हे केवळ स्वादिष्टच नाही, तर आरोग्यासाठी एक अमूल्य संपत्ती आहे. महिलांनी आपल्या दैनंदिन आहारात डाळिंबाचा समावेश केल्यास दीर्घकाळ निरोगी आणि सक्रिय राहता येईल.

# शुन्य मशागत 'तंत्र'च का? जाणून घ्या सविस्तर

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक**
शून्य मशागत तंत्रज्ञान म्हणजे जमिनीची फारशी मशागत न करता पिके किंवा कुरण वाढविण्याचे तयार करण्यात आलेले एक कृषी तंत्र आहे. या तंत्रातून जमीनीची धूप रोखण्यास मदत होते. आज आपण या तंत्रज्ञानाचा वापर करणे का आवश्यक आहे. या विषयीची माहिती वाचणार आहोत.

शून्य मशागत तंत्रज्ञानातून शेती केल्यास जमिनीत, विशेषतः उतार असलेल्या भूभागावरील वालुकामय आणि कोरड्या जमिनीत होणारी जमिनीची धूप रोखण्यासाठी अत्यंत उपयोगी आहे.

**शुन्य मशागतीचा उपयोग**

जमिनीत शिरणाऱ्या पाण्याचे प्रमाण वाढवते, सेंद्रिय पदार्थ मातीत टिकून राहण्यास मदत करते आणि पोषक घटक जमिनीस देणे याचा समावेश या तंत्रात होतो.

या पद्धतींमुळे जमिनीखाली आणि पृष्ठभागावरील नैसर्गिक जीवजंतूच्या प्रमाणात आणि विविधतेत वाढ दिसून येते.

रासायनिक पद्धतीत तणांच्या नियंत्रणासाठी तणनाशकांचा वापर केला जातो, तर सेंद्रिय पद्धतीत तण दाबण्यासाठी आच्छादन पिके लावून त्याचे अवशेष आच्छादन म्हणून शेतात काम करतात.




आज शेतीमध्ये मशागतीचे फार महत्व आहे. परंतु नो-टिल पद्धतीने शेती केल्यास यशस्वी होऊ शकते. किमान मशागत किंवा लो-टिल पद्धती आणि नो-टिल पद्धती एकत्र करतात. त्यामुळे उथळ मशागत वापरली जाऊ शकते. परंतु नांगरणी केली जात नाही किंवा पट्टी मशागतीचा वापर केला जात नाही. तसेच यंत्राने केली जाणारी मशागत पुर्ण बंद होणे गरजेचे आहे.

**रासायनिक खतांचा दुष्परिणाम**

रासायनिक खतांचा भरमसाठ वापर वाढल्यामुळे जमीनीतील सेंद्रीय कर्ब कमी आहे. खतांच्या अतिवापर आणि चुकीच्या वापरामुळे मातीची सुपीकता घटते आहे. पर्यावरणाची हानी होताना दिसत आहे. त्याच बरोबर मानवाच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम हळू हळू होत आहे.

**ही आहेत कारणं**

**मातीची सुपीकता घटणे** : रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे मातीतील सेंद्रिय घटक कमी होतात, ज्यामुळे मातीची सुपीकता कमी होते.

**जमिनीचे आम्लीकरण :** रासायनिक खतांमध्ये नायट्रोजनचे प्रमाण जास्त असल्याने, ते जमिनीला आम्लीय बनवतात, ज्यामुळे पिकांची वाढ खुंटते.

पाणी प्रदूषण : रासायनिक खतांचे घटक पाण्याचे प्रदूषण करतात, ज्यामुळे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा दूषित होतो.

**हवामान बदल** : रासायनिक खतांच्या उत्पादनामुळे आणि वापरामुळे ग्रीनहाऊस गॅसचे उत्सर्जन वाढते, ज्यामुळे हवामान बदलाची समस्या वाढते.

जैवविविधता कमी होणे : रासायनिक खतांच्या अतिवापर आणि चुकीच्या वापरामुळे मातीतील सूक्ष्मजीवांसाठी योग्य वातावरण राहत नाही, ज्यामुळे जैवविविधता कमी होते.




मानवी आरोग्य धोक्यात : रासायनिक खतांच्या अतिवापर आणि चुकीच्या वापरामुळे पिकांमध्ये विषारी घटक वाढतात, ज्यामुळे मानवाच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ लागला आहे.

**कीटकांची संख्या वाढणे :** रासायनिक खतांच्या चुकीच्या वापरामुळे मातीतील नैसर्गिक कीटकनाशक घटकांची संख्या कमी होते, ज्यामुळे कीटकांची संख्या वाढते.

या सगळ्या गोष्टींवर मात करण्यासाठी शून्य मशागत तंत्रज्ञान (नशी ढळश्रश्ररसश ढशलहपेश्रेसू) अधिक फायदेशीर ठरू शकते. जमीनीत सेंद्रिय पदार्थ कुजण्याची प्रक्रिया कायम सुरू ठेवणे आवश्यक आहे.

यामुळे परिश्रम, इंधन, पाणी तसेच यंत्रसामग्रीवर होणारा खर्च टाळता येऊ शकतो. त्याच बरोबर या तंत्रातून आपण जास्तीत जास्त पाणी जमीनीत मुरण्यास तसेच पाणी धारण क्षमता वाढण्यास उपयोगी ठरते.

बदलत्या हवामानाचा पर्जन्यमान वितरणावर परिणाम झाला आहे. कुठे अति पाऊस पडतो तर कुठे पावसाचे प्रमाण कमी झाले आहे. त्याचा थेट परिणाम शेतीवर होताना दिसतो. त्यामुळे आता शेतकऱ्यांनी पर्यावरणपूरक शेतीकडे वळणे आवश्यक आहे.

# नुकसान भरपाईच्या मदतीसाठी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचा तहसील कार्यालयात ठिय्या!

## ८ दिवसात शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदान जमा न झाल्यास आंदोलनाचा ईशारा !

### हजारो संत्रा उत्पादक शेतकरी अनुदानापासून वंचित !

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९मोर्शी**- मोर्शी तालुका विक्रमी संत्रा उत्पादनासाठी प्रसिद्ध असून मोठ्या प्रमाणात संत्रा उत्पादक असलेल्या मोर्शी तालुक्यात गेल्या वर्षी सप्टेंबर व ऑक्टोबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे संत्रा पिकांच्या नुकसान भरपाई मिळण्याकरिता महसुल यंत्रणेमार्फत जानेवारी ते मार्च महिन्यापर्यंत विविध व्हिके नंबर च्या याद्या प्रसिद्ध करून लाभार्थी संत्रा शेतकऱ्यांना आवाहन करून सेतू केंद्रातून ई-केवायसी करायला सांगीतली. त्याला प्रतिसाद देत शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात ई-केवायसी केली. मात्र त्यावर दोन महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लोटला तरी अजूनही नुकसानग्रस्त संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम जमा झाली नसल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदानासाठी तहसील कार्यालयात हेलपाटे मारावे लागत असल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचा शासनाप्रती रोष वाढत असून शासनाने त्वरित संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात फळगळती अनुदान मदत तात्काळ संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका उपाध्यक्ष तथा ग्राम पंचायत सदस्य रुपेश वाळके यांच्या नेतृत्वात तहसील कार्यालयात ठिय्या देऊन उप विभागीय अधिकारी प्रदीप कुमार पवार, तहसीलदार विनोद वानखडे यांना निवेदन देऊन करण्यात आली. आंबिया बहराच्या संत्र्याची गळती होऊन शिल्लक राहिलेला संत्रा कवडीमोल भावाने विकावा लागला, तर दुसरीकडे तालुक्यातील संत्रा बागांवर मृग बहार संत्रा नसल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. कृषी कर्ज भरण्याकरिता अवघे काही दिवस शिल्लक आहेत. शेतकऱ्यांना कृषी कर्ज भरायचे असल्याने त्याकरिता या अनुदानाची रक्कम मिळेल व आपल्या जवळील काही रक्कम टाकून कर्जाची परतफेड करता येईल, असा विचार संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी केला होता. परंतु, शासनाने त्यांच्या विचारांवर पाणी फेरले.




आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucngmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. ९ एप्रिल २०२५

शहर/ग्रामिण




# डोळ्यात राख उडाल्याने अनियंत्रित हार्वेस्टरने दुचाकी चालकास चिरडले

## राखेच्या वाहनांवर कार्यवाही करण्यासाठी कुटुंबीयांचा आक्रोश

### मृतदेह ताब्यात घेण्यास कुटुंबीयांचा नकार





नांदगाव पेठ बस स्टॅन्ड वरील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९नांदगाव पेठ–** भरधाव वाहनांमधून उडणाऱ्या राखेमुळे महामार्गालगत असलेल्या अनेक गावातील नागरिकांना आरोग्याचा धोका निर्माण झाला आहे शिवाय वाहनचालकांच्या डोळ्यात ही केमिकलयुक्त राख शिरत असल्याने अपघाताची शक्यता आहे असे असतांनाही या गंभीर प्रकाराकडे प्रशासनाने डोळेझाक केल्यामुळे मंगळवारी एका २८ वर्षीय युवकाला आपले प्राण गमवावे लागले. नांदगाव पेठ बस स्टॅन्ड वर मंगळवारी दुपारी दीड वाजताच्या सुमारास वाहनातील राख हार्वेस्टर चालकाच्या डोळ्यात शिरल्यामुळे अनियंत्रित हार्वेस्टरने दुचाकी चालकास चिरडल्याची दुर्दैवी घटना घडली.या घटनेत ऋषिकेश सुभाष निंभोरकर (२८) रा. नांदुरा बु.हा युवक जागीच ठार झाला. घटनेनंतर कुटुंबीयांनी शवागृहासमोर आक्रोश करत राखेच्या वाहनांवर कार्यवाही करण्यात यावी ही मागणी रेटून धरत मृतदेह उचलण्यास नकार दिला होता. याबाबत सविस्तर वृत्त असे की,ऋषिकेश निंभोरकर हा बिझिलँड येथील एटीएम वर कार्यरत होता. मंगळवारी दुपारी आपले कर्तव्य बजावून दीड वाजताच्या सुमारास नांदगाव पेठ वरून नांदुरा बु येथे जात असतांना विरुद्ध दिशेने येत असलेल्या हार्वेस्टर चालकाच्या डोळ्यात भरधाव वाहनातील राख उडाल्यामुळे हार्वेस्टर चालकाचे संतुलन बिघडले आणि समोरून येणाऱ्या ऋषिकेशच्या वाहनाला अनियंत्रित हार्वेस्टरने जबर धडक दिली.या अपघातात ऋषिकेश जागीच ठार झाला तर हार्वेस्टर चालकाने तेथून पोबारा केला. घटनेनंतर नांदगाव पेठ पोलिसांनी हार्वेस्टर चालकाला ताब्यात घेतले आणि ऋषिकेशचा मृतदेह जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवला. घटनेची माहिती कुटुंबियांना मिळताच त्यांनी शवागृहासमोर आक्रोश करत मृतदेह उचलण्यास मनाई केली.ऋषिकेश हा प्रहार जनशक्ती पक्षाचा कार्यकर्ता असल्याने प्रहारचे जिल्हाप्रमुख छोटू महाराज वसू व प्रहार कार्यकर्ते शवागृहाजवळ पोहचले. छोटू महाराज वसू यांनी कुटुंबीयांचा आक्रोश बघताच पोलीस आयुक्त यांना भेटून रतन इंडिया मधून येणाऱ्या राखेच्या वाहनांवर प्रशासन का कार्यवाही करत नाही असा सवाल उपस्थित केला. पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी,उपायुक्त सागर पाटील यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेता तसेच मृतदेहाची विटंबना होऊ नये यासाठी त्यांनी छोटू महाराज वसू व कुटुंबियांना विश्वासात घेऊन या संदर्भात पोलीस उपायुक्त सागर पाटील यांनी प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांच्याशी भ्रमणध्वनी वरून संपर्क करून घटनेचे गांभीर्य त्यांच्या लक्षात आणून दिले. व त्यानंतर लगेच प्रादेशिक परिवहन विभागाचे मो वा नि. निलेश दहेकर,पल्लवी दौड,स.मो. वा.नि. निलेश जाधव,कांचन जाधव,नांदगाव पेठचे पोलीस निरीक्षक महेंद्र अंभोरे यांनी कुटुंबियांची भेट घेऊन रतन इंडिया ऊर्जा प्रकल्प या कंपनीवर तसेच राखेच्या वाहनांवर योग्य ती कार्यवाही करून मृतक ऋषिकेशला नुकसान भरपाई देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे लेखी पत्र मृतकाच्या कुटुंबियांना दिले. त्यानंतर कुटुंबीयांनी ऋषिकेशचा मृतदेह ताब्यात घेऊन नांदुरा बु येथील त्याच्या गावी अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाप्रमुख छोटू वसु महाराज, प्रशांत शिरभाते,इमरान शहाल,नितीन शिरभाते, सचिन महल्ले, मयूर निंभोरकर, ऋषिकेश पंचवटी, गजानन भूगूंल,चंदू खेडकर, विशुद्ध जंवजाळ, निलेश पानसे, चंदू उगले व नांदुरा बुद्रुक येथील गावकरी उपस्थित होते

#### पाच हजारांत राख उडवायचा परवाना ?

रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पातून निर्माण होणारी ही राख ओव्हरलोड आणि असुरक्षितरित्या वाहनांमधून वाहतूक केली जाते.एका वाहनाचे प्रादेशिक परिवहन विभागाला पाच हजार रुपये देण्यात येते असे वाहनचालकांचे म्हणने आहे.त्यामुळे पाच हजार रुपयांत वाहनांना राख उडवायचा परवाना दिला जातो का असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.एरव्ही लहान वाहनांवर मोठी कार्यवाही करणारे अधिकारी राखेच्या, वाळूच्या ओव्हरलोड वाहनांवर कार्यवाही करतांना दिसुन येत नाही हे विशेष!

ऋषिकेशच्या आईचे निधन झाल्यामुळे ऋषिकेश आणि त्याचे वृद्ध वडील हे दोघेच राहत होते. ऋषीकेश हा वडिलांचा एकुलता एक आधार होता. आपली नोकरी सांभाळून आपल्या वडिलांचा सांभाळ तो करत होता.मात्र तरुण मुलाचे अपघाती निधन झाल्यामुळे वृद्ध वडिलांलहर आधार हिरावला गेला.

#### सर्वच विभाग कारणीभूत

रतन इंडियामधील राखेमुळे अनेक दुष्परिणाम उद्भवत आहेत.महत्वाचे म्हणजे सर्वात मोठा त्रास हा दुचाकी चालकांना किंवा ट्रॅक्टर चालकांना होत आहे.याबाबत अनेक तक्रारी जिल्हाधिकारी,पोलीस आयुक्त, प्रादेशिक परिवहन विभाग, प्रदूषण विभाग,उत्खनन विभाग यांना दिलेल्या आहेत मात्र केवळ तक्रारीपुरती कार्यवाही करायची आणि नंतर आपले हात झटकायचे असा काहीसा प्रकार संबंधित विभागाकडून होत आहे.

#### प्रहारचा निर्वाणीचा इशारा

प्रादेशिक परिवहन अधिकारी तसेच पोलीस निरीक्षक नांदगाव पेठ यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेता लेखी पत्र देऊन कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले मात्र उद्यापासून राख उडविणारी वाहने, तसेच ओवरलोड वाहने महा मागा वरून धावतांना दिसल्यास त्या वाहनांची आम्ही तोडफोड करू .याची सर्वस्वी जबाबदारी ही प्रादेशिक परिवहन अधिकारी व पोलीस प्रशासनाची असेल असा निर्वाणीचा इशारा प्रहारचे जिल्हा प्रमुख छोटू वसू महाराज यांनी दिला.

# शहर वाहतुकीत १४ एप्रिल रोजी तात्पुरता बदल

## पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे पोलीसांचे आवाहन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती,–** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव दि. १४ एप्रिल रोजी असल्याने यादिवशी मिरवणूका, उत्सव आदी बाबी लक्षात घेता शहर वाहतुकीत बदल करण्यात आला आहे, अशी माहिती अमरावती शहर वाहतूक विभागाच्या पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर यांनी दिली आहे.तात्पुरत्या अधिसूचनेनुसार यादिवशी इर्विन चौकाकडे येणारी सर्व प्रकारची वाहतूक इतर मार्गाने वळविण्यात आली आहे. ही अधिसूचना दि. १४ एप्रिल रोजी सकाळी ५ वाजेपासून रात्री १२ वाजेपर्यंत लागू राहील. नागरिकांनी पर्यायी मार्गाचा अवलंब करून पोलीसांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

इर्विन चौक ते खापर्डे बगीचा हा मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद राहील. गर्ल्स हायस्कुल चौक ते इर्विन चौक हा मार्ग सर्व प्रकारच्या वाहनासाठी बंद राहील. बाबा कॉर्नर ते इर्विन चौक हा मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद राहील. मर्च्युरी टी पॉईंटकडून इर्विन चौकाकडे येणारा मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद राहील. इर्विन चौक ते मालविय चौक हा मार्ग सर्व प्रकारच्या वाहनांसाठी बंद राहील. तसेच मर्च्युरी टी पॉईंट ते इर्विन चौक तसेच ट्रॅफिक ऑफिस, इर्विन चौक ते होलिक्रॉस शाळेचे प्रवेशद्वारापर्यंत कोणतेही वाहन पार्क करता येणार नाही.

#### हे असतील पर्यायी मार्ग

इर्विन चौक ते खापर्डे बगिचा या मार्गाने वाहतूक करणाऱ्या वाहनांनी एस. टी. बसस्थानक मार्गाचा अवलंब करावा. गर्ल्स हायस्कूल चौक ते इर्विन चौक या मार्गाने वाहतूक करणारी वाहने पोलीस पेट्रोल पंप चौक किंवा बाबा कॉर्नर ते विलास नगर रोड या मार्गाचा अवलंब करतील. बाबा कॉर्नर ते इर्विन चौक या मार्गाने वाहतुक करणाऱ्या वाहनांनी लेखूमल चौक किंवा पोलीस पेट्रोल पंप या मार्गाचा अवलंब करावा.

रेल्वे स्टेशन चौक ते मर्च्युरी टी पॉईंट या मार्गाने वाहतूक करणारी वाहने रेल्वेस्थानक ते एस. टी. स्थानक व जयस्तंभ चौक, दीपक चौक, चौधरी चौक या मार्गांचा अवलंब करतील. मालविय चौक ते इर्विन चौकाकडे येणाऱ्या वाहनानी मालविय चौक, जयस्तंभ चौक, रेल्वे स्टेशन चौक या मार्गाचा अवलंब करतील. वरील वाहतूक नियम रूग्णवाहिका, अग्निशामक वाहन, कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अत्यावश्यक सेवेच्या वाहनांना लागू राहणार नाही.

# आ प्रताप अडसड यांच्या पुढाकाराने विदर्भातील प्रकल्पग्रस्तांची प्रतिक्षा अखेर संपली

## गुरुवारी ८३२ कोटी रुपये सानुग्रह अनुदान वाटपाचा शुभारंभ


### विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेचे आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९धामणगाव रेल्वे–**विदर्भ बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेच्या माध्यमातून गेल्या दहा वर्षांपासून सरळ खरेदी धारक शेतकऱ्यांवर झालेल्या अन्यायाला न्यायात परिवर्तीत करण्यासाठी विदर्भातील हजारो प्रकल्पग्रस्तांनी प्रचंड आंदोलने केलीत तत्कालीन सरकारने सिंचन प्रकल्पांसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी घेताना १८९४ चां भूसंपादन कायदा अस्तित्वात असताना सरळ खरेदी पद्धतीने शेतकऱ्यांच्या जमिनी खरेदी करून घेतल्या होत्या विशेष म्हणजे घटनेने दिलेल्या मुलभूत संवैधानीक अधिकार सुध्दा सरकारने गोठवून टाकले होते.त्यामुळे शेतकऱ्यांना न्यायालयात जाता आले नाही. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या समोर भविष्याचा मोठ यक्षप्रश्न निर्माण झाला होता.या संपूर्ण चळवळीत सुस्वभावी माणुसकी जपणारे आमदार प्रतापदादा अडसड यांनी आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून प्रकल्पबाधीतांना न्याय मिळवून देण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले व त्यांच्या प्रयत्नांना अखेर २४/ सप्टेंबर २०२४ रोजी यश प्राप्त झाले. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नियामक मंडळाच्या ८५ व्या बैठकीत विदर्भातील प्रकल्पग्रस्त सरळ खरेदी धारक शेतकऱ्यांना ८३२ कोटी रुपये सानुग्रह अनुदान मंजूर केले.आपल्या जिवाची पर्वा न करता प्राण पणाने लढणारं संघटनेचं कुशल नेतृत्व मनोज चव्हाण यांच्या संघर्षाचा अखेर विजय झाला. विदर्भातील हजारो प्रकल्पग्रस्त सुवर्ण क्षणांची आतुरतेने वाट बघत होते तो सुवर्ण क्षण आला असुन. येत्या १० एप्रिल २०२५ रोजी श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक अमरावती येथे ८३२ कोटी रुपये सानुग्रह अनुदान धनादेश वितरण शुभारंभ प्रतिनिधिक स्वरूपात आयोजित करण्यात आला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते हा शुभारंभ होणार असुन प्रमुख उपस्थिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे मंत्री गिरीश महाजन मा.ना.आकाश फुंडकर, .संजय राठोड,अशोक ऊईके ,इंद्रनील नाईक ,व विदर्भातील सर्व सन्माननीय आमदार यांच्या प्रमुख उपस्थितीत शुभारंभ होणार आहे.या ऐतिहासिक शुभारंभ प्रसंगी मां मंत्री महोदय व प्रताप दादा अडसड यांचा सत्कार सुध्दा संघटनेच्या वतीने करण्यात येणार आहे.या सुवर्ण क्षणांचे साक्षीदार होण्यासाठी विदर्भातील हजारो प्रकल्पग्रस्त शेतकरी येणार असल्याचे मनोज चव्हाण यांनी सांगितले.

# डॉ. जयराज फाटक, भा. प्र. से. (से. नि.) महासंचालक यांनी दिली अमरावती महापालिकेला सदिच्छा भेट



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती–** डॉ. जयराज फाटक, भा. प्र. से. (से. नि.) महासंचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांनी आज दिनांक ८ एप्रिल,२०२५ रोजी अमरावती महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे भा.प्र.से. यांनी डॉ. जयराज फाटक यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. डॉ. जयराज फाटक यांचे सोबत संस्थेचे विभागीय संचालक जयंत पाठक, अमरावती उप केंद्राचे सोहम कुलकर्णी उपस्थित होते. नगरविकास आणि शिक्षण व प्रशिक्षण या विषयात संस्थेच्या योगदानाबद्दल यावेळी उपस्थित अधिकारी वर्गाशी चर्चा झाली. डॉ. जयराज फाटक यांनी मुंबई महानगरपालिकेत आयुक्त असतांनाचे अनुभव पण सांगितले. यावेळी अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, सहायक आयुक्त भुषण पुसतकर, नंदकिशोर तिखिले, दिपीका गायकवाड, धनंजय शिंदे उपस्थित होते.

# स्वातंत्र्य सैनिकांना प्रशासनाची सर्वतोपरी मदत

## जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांची ग्वाही





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती –** शासनाच्या शंभर दिवसाच्या कृती कार्यक्रमाच्या अनुषंगाने स्वातंत्र्यसैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. प्रशानातर्फे मदत पुरविताना स्वातंर्त्य सैनिकांना कोणताही त्र–ास होऊ दिला जाणार नाही. त्यांना प्रशासनाचे सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिली.नियोजन भावनात स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, आणीबाणीतील करावास भोगलेल्यांसाठी मोफत आरोग्य शिबिर घेण्यात आले. यावेळी गोवा मुक्ती संग्रामातील स्वातंर्त्य सैनिक मुलायमचंद जैन, कुसुमलता जैन, आणीबाणीतील कारावास भोगलेले मधुसूदन उमेकर, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, तहसीलदार प्रशांत पडघन, निलेश कटके, जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे आदी उपस्थित होते. जिल्हाधिकारी कटियार म्हणाले, स्वातंत्र्य संग्रामातील सैनिकांचे वय अधिक झाले आहे. त्यामुळे आजच्या शिबिरातून एकाच ठिकाणी विविध तपासण्या करण्यात येत आहेत. तसेच स्वातंत्र्यसैनिकांना आरोग्यविषयक तपासणी त्यांनी सुचविलेल्या ठिकाणी घेता येईल. यासाठी त्यांनी प्रशासनाकडे मागणी करावी. आजच्या शिबिरामधून स्वातंर्त्य सैनिकांना प्रशासनामध्ये येणाऱ्या अडचणी किवा समस्या असल्यास त्या जाणून घेण्यात येणार आहे. यासाठी प्रत्येकाने प्रशासनाविषयी असलेल्या अपेक्षा या ठिकाणी मांडाव्यात. स्वातंत्र्य सैनिकांनी देशासाठी मोठेकार्य केले आहे. त्यांना योग्य ती मदत देण्यासाठी प्रशासन तत्पर आहे. आवशयकता भासल्यास स्वातंत्र्य सैनिकांना घरपोच मदत दिली जाईल. आवश्यकता असल्यास आरोग्यविषयक तपासणीचे शिबिर स्वातंर्त्य सैनिकांच्या सोयीने घेतले जाईल. त्यासोबतच जिल्हास्तरावर असलेले विषय तातडीने मार्गी लावण्यात येईल, असेही सांगितले. निवासी उप जिल्हाधिकारी भटकर यांनी प्रास्ताविकातून आरोग्य तपासणी शिबिर आयोजन करण्यामागील उद्देश सांगितला. या शिबिराचा सर्वांनी लाभघ्यावा, असे आवाहन केले. जैन यांनी स्वातंर्त्य चळवळी विषयी असलेल्या कवितेतून भावना व्यक्त केल्या. उमेकर यांनी प्रशासन चांगला उपक्रम राबवित असून यासाठी नेहमी सहकार्य देण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी जैन, श्रीमती जैन आणि उमेकर यांचा सत्कार करण्यात आला. भावना जिचकर यांनी स्वातंर्त्य चळवळीचा इतिहास सांगितला.

# दहावी, बारावीच्या १२३७ विद्यार्थ्यांचे ग्रेस गुणांसाठी अर्ज

## १६९ अर्ज रिजेक्ट, १५ एप्रिलपर्यंत मुदत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती** – क्रीडा



विभागातर्फे घेण्यात येणाऱ्या क्रीडा प्रकारात सहभागी होणाऱ्या दहावी-बारावीच्या खेळाडू विद्यार्थ्यांना ग्रेस गुणांचा लाभ दिला जातो. त्यासाठी ऑनलाइन अर्ज करावे लागतात. अमरावती जिल्ह्यातील दहावी व बारावीतील एकूण १२३७ विद्यार्थ्यांनी ग्रेस गुण मिळविण्यासाठी, आपले ऑनलाइन पद्धतीने अर्ज केले आहे. त्यात दहावीच्या ७६६ व बारावीच्या ४७१ खेळाडूंचा समावेश आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी आता खेळांना महत्व दिले जात आहे. त्यामुळे शिक्षणासोबत खेळात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना ग्रेस गुण दिले जात असल्याने, आता विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा क्षेत्राचे आकर्षण वाढलेले आहे. अनेक विद्यार्थी हे क्रीडा क्षेत्राकडे वळले आहेत. विद्यार्थ्यांना परीक्षेत मिळणाऱ्या एकूण गुणांमध्ये ग्रेस गुण समाविष्ट केले जाते. सन २०२३-२४ पर्यंत ही प्रक्रिया ऑफलाइन होती. परंतु २०२४-२५ पासून ग्रेस गुणांसाठी आपले सरकार पोर्टलद्वारे ऑनलाइन पद्धतीने, सर्व अर्ज महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडे सादर करण्याची सुविधा उपलब्ध करूनदेण्यात आलेली आहे. आपले सरकारमार्फत क्रीडा विभागाला दहावी व बारावी मिळून एकूण १२३७ अर्ज प्राप्त झाले आहेत.

### ४९ क्रीडा प्रकारांमध्ये ग्रेस गुण

दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना ग्रेस गुणांचा लाभ मिळण्यासाठी ४९ क्रीडा प्रकारांना मान्यता देण्यात आलेली आहेत. त्यात ऑलिम्पिक, एशियन, कॉमनवेल्थमध्ये समाविष्ट असणाऱ्या खेळ प्रकारात आर्चरी, अ‍ॅथलेटिक्स, वेट लिफ्टींग, बॉक्सींग, बास्केटबॉल, सायकलिंग, तलवारबाजी, फुटबॉल, हँडबॉल, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, ज्युदो, व्हॉलीबॉल, लॉन टेनिस, रायफल शुटिंग, टेबल टेनिस, तायक्वांदो, जलतरण, कुस्ती, कब्बडी, सॉफ्टबॉल, बेसबॉल, नेटबॉल, कराटे, स्क्वॅश, युशु, नेहरु हॉकी, सुब्रतो फुटबॉल, रग्बी, सेपेक टकारा, मॉर्डन, पेन्टेथलॉन, सॉफ्ट टेनिस या खेळांचा समावेश आहे. तर ऑलिम्पिक, एशियन, कॉमनवेल्थमध्ये समाविष्ट नसणाऱ्या खेळ प्रकारात मल्लखांब, बॉल बॅडमिंटन, बुद्धीबळ, थ्रोबॉल, योगासन, सिकई, डॉजबॉल, टेनिवचाइट, खो-खो, कॅरम, क्रिकेट, रोल स्केटिंग, हॉकी, किक बॉक्सिंग, रोलबॉल, शुटिंग बॉल, आट्या-पाट्या या खेळांचा समावेश आहे. क्रीडा ग्रेस गुण मिळविण्यासाठी अर्जाची मुदत १५ एप्रिलपर्यंत आहे.-

# अमरावती शहरात हे चाललं काय?वाहतुकीला अडथळा, वाहनचालकांचे लक्ष विचलित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती** – समाज माध्यमांवरील रिल्स बनविण्याच्या नादात युवक युवती कशाचीही पर्वा न करता नको ते धाडस करतात. काही बहाद्दर प्रसिद्धीच्या झोतात येण्यासाठी नागरिकांची क्षणिक करमणूक तर करतात, परंतु त्याचा इतर नागरिकांना काय त्रास होणार याची कवडीची चिंता करीत नाहीत. समाजमाध्यमांवरील असाच एक प्रकार मंगळवारी अमरावती शहरात दिवसभर चर्चेचा राहिला.

कलावंत उत्साही चाळीस ते पन्नाशीतील जोडप्याने अमरावती शहरातील बाबा कॉर्नर या अंत्यत वर्दळीच्या चौकात शनिवारी (ता. पाच) भरदुपारी रस्त्यावर उतरून कैसे कटे दिन, कैसे कटी राते, पुछो न साथिया, जुदाई की बाते..., या गाण्यावर सरगम स्टाईल भन्नाट नृत्य सादर केले. त्याची रिल्स समाजमाध्यमावर व्हायरल केली. राणी रंगाची सोनेरी काठपदराची साडी त्यालाच साजेशी बाहेरून करडी व आतुन गुलाबी रंगाची जुती आणि सोनेरी रंगाचे ब्लाऊज घातलेली मध्यमवयीन महिला तर पिवळ्या रंगाचा पूर्ण बाह्याचा सदरा व पायात करड्या रंगाचा शूज घातलेला मध्यवयीन पुरूषाने या नृत्यात मुख्य भूमिका बजावली. पुरूषाने हातात डफ घेऊन 'सरगम' चित्रपटासाठी लता मंगेशकर, मोहम्मद रफी यांनी गायिलेल्या व ऋषी कपूर, जयाप्रदा यांच्या नृत्यावरील




'डफली वाले डफली बजा... मेरे घुंगरू बुलाते है आ, मै नाचू तू नचा..' या गाण्याला साजेसा डफ वाजवून नृत्यिकेला उत्साहात जबरदस्त साथ दिल्याचे रिल्समध्ये दिसत आहे. हा प्रकार भरदुपारी घडल्याचे त्यात दिसून येत आहे. संबंधित रिल्स ही देवदास इंगोले या खातेधारकाच्या फेसबूकवर सर्वप्रथम शेअर करण्यात आली असून ही रिल्स तब्बल पाच हजार व्यक्तींनीबघितली आहे. १२५ व्यक्तींनी लाईक केली असून ४१ व्यक्तींनी ती शेअर केलेली आहे. कलावंतांच्या कलेचे कौतुक असावे,पण वाहतुकीला अडथळा, वाहनचालकांचे लक्ष विचलित करणारा हा प्रकार नाही का, एखाद्या वाहनाचे जर अचानक ब्रेक निकामी झाले तर अशा स्थितीत अपघाताची स्थिती निर्माण होणार नाही का?, याचा कवडीचा विचार रिल्स तयार करताना केलेला दिसून येत नाही. देवदास इंगोले आणि स्विटी (काल्पनिक नाव) यांनी यापूर्वीही महामार्गासह अन्य ठिकाणी अशा काही रिल्स केल्याचे सांगण्यात येते.

# मंदिरात बनावट लग्न लावत अल्पवयीनवर बलात्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९परतवाडा,**अल्पवयीन युवतींना लग्नाचे आमिष देऊन त्यांच्यावर बलात्कार करणे आणि युवतींना गर्भवती बनवून त्यांच्यावर जबरीने मातृत्व लादण्याच्या घटना सध्या प्रचंड वाढल्या आहेत.

अशातच एका २१ वर्षीय युवकाने १७ वर्षाच्या मुलीसोबत मंदिरात बनावट लाऊन लिव्हइनमध्ये तिच्यावर सतत बलात्कार केला. अशातच युवती गर्भवती झाली. युवतीची प्रसूतीवेळ आल्यानंतर आरोपीने तिला उपजिल्हा रूग्णालयात प्रसूतीसाठी दाखल केले आणि फरार झाला. युवतीच्या प्रसूतीनंतर रूग्णालयाचा मेमो आल्याने याबाबत चिखलदरा पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हे दाखल केले आहे.जय अनिल धांडेकर (२१) रा.मडकी, ता. चिखलदरा असे गुन्हे दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. माहितीनुसार, आरोपी जय धांडेकर याची ऑगष्ट २०२४ मध्ये कामाच्या ठिकाणी सोबत काम करताना १७ वर्षाच्या मुलीसोबत ओळख झाली.

ओळख होताच जयने मुलीला लग्नाचे आमिष देऊन प्रेमाच्या जाळ्यात ओढले. अशातच ८ ऑगष्ट २०२४ रोजी जयने लग्नाचे आमिष युवतीचे अपहरण केले. त्यानंतर जयनेने चिखलदरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका मंदिरात युवतीच्या गळ्यात केवळ हार टाकून तिच्यासोबत लग्नाचा बनावट केला.

त्यानंतर जयने भाडयाच्या घरात दोन महिने लिव्हइनमध्ये राहून युवतीवर सतत बलात्कार केला. अशातच युवतीला गर्भधारणा झाली. काही दिवसांपूर्वी युवतीची प्रसुतीची वेळ जवळ आल्याने जयने युवतीला प्रसूतीसाठी उचलपुर उपजिल्हा रूग्णालयात दाखल केले. परंतु, आधार कार्डवर युवतीचे वय कमी असल्याने प्रकरण अंगलट येईल म्हणून जय रूग्णालयातून पसार झाला.

युवतीच्या प्रसूतीनंतर अचलपुर उपजिल्हा ग्रामीण रूग्णालयाने याबाबत चिखलदरा पोलिसांना मेमो पाठविला. त्या आधारे चिखलदरा पोलिसांनी आरोपी जय धांडेकर विरोधात गुन्हे दाखल केले असून पोलिस पुढील तपास करित आहेत.

# जिल्हाधिकाऱ्यांनी जाणून घेतले अंनिसचे अनुभव

## रेट्याखेडा प्रकरणानंतर जनजागृतीवर भर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती** – मेळघाटातील रेयट्याखेडा येथे जानेवारी महिन्यात जादुटोण्याच्या संशयावरून वृद्धला मारहाण आली होती. या प्रकरणाची दखल घेऊन जिल्हा प्रशासनाने गावात अंद्धश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून जनजागती घडवून आणली आहे. याबाबत अनिसच्या राज्य कार्यकारीणी सदस्य नंदिनी जाधव यांनी जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांची भेट घेऊन मेळघाटातील अनुभव सांगितले.

जिल्हाधिकारी कटियार यांनी अंनिसच्या अनुभवाचा प्रशासनाला निश्चितच फायदा होणार आहे. येत्या काळात अंधश्रद्धेबाबत जनजागृती करताना अनिसला सोबत घेतले जाईल. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून अनेक उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमात मेळघाटात आलेल्या अनुभवाच्या अनुषंगाने जनजागतीवर भर देण्यात येणार असल्याचे सांगितले श्रीमती जाधव यांनी त्यांच्या चमूसह २२



दिवस ७२ मेळघाटातील गावात जादूटोण्याबाबत जनजागृती केली. या भागातील आदिवासींमध्ये अंधक आणि इतर प्रथांचा पगडा आहे आजारी पडल्यानंतर रूग्णालयात जाण्याऐवजी भूमका, भगत यांच्यावर जास्त विश्वास आहे. गावात कार्यक्रम होताना कोणत्याही नागरिकानी विरोध केला नाही. तसेच अंधश्रद्धेबाबत माहिती जाणून घेण्यासाठी नागरिक उत्सुक आहेत. रात्री उशिराही छोट्या गावात नागरिक माहिती घेण्यासाठी एकत्र येत, असल्याचे सांगितले. मेळघाटा मध्ये खटीयावालेबाबा यांच्या नावाने लोकांच्या मनात भिती आहे. नागरिकांमध्ये असलेल्या अशा प्रकारच्या अंधश्रद्धा दूर करण्यासाठी प्रामुख्याने ग्रामसेवक, पोलिस पाटील, आशा, अंगणवाडी सेविकांचे प्रशिक्षण घ्यावे. त्यांच्या माध्यमा तून नागरिकांच्या मना तील शंका दूर करण्यास निश्चित मदत होणार आहे. तसेच अंनिसने अंधश्रद्धा दूर करण्यासाठी व्हीडीओ तयार केले आहेत. याचाही पुढील काळात प्रभावीपणे उपयोग करून नागरिकांमध्ये असणाऱ्या समजूती दूर करण्यावर भर देण्यात येणार असल्याचे सांगितले. यावेळी अंनिसचे श्रीकृष्ण धोटे, भगवानरणदिवे, सागर बावणे आदी उपस्थित होते.

विदर्भ प्रजासत्ताक

# भाजप ग्रामीण अध्यक्षपदाच्या निवडणुकीत राडा

## अंजनगाव सुर्जीच्या शासकीय विश्रामगृह येथे हमरी-तुमरी, वादविवादही

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अंजनगाव सुर्जी** – भाजपा शहर, ग्रामीण अध्यक्षाची निवडणूक शासकीय विश्रामगृहात मंगळवारी प्रचंड गदारोळात झाली. अचानक प्रक्रियेची घोषणा झाली आणि ऐनवेळी जागेचे नियोजन झाल्याने गोंधळ उडाला. त्यामुळे ग्रामीण मंडळ अध्यक्षाची निवडणूक प्रक्रिया तूर्तास रद्द करण्यात आली.येथील शासकीय विश्रामगृहात ८ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता भाजपा अंजनगाव शहर व ग्रामीण मंडळ अध्यक्ष निवडणूक आयोजित करण्यात



आली. या निवडणुकीसाठी ग्रामीण व शहरातील भाजपा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते. तथापि, मंडळ अध्यक्षासाठी ४५ वर्षे वयाची अट घालण्यात आली. अचानक लावलेल्यानिवडणूक प्रक्रिया व जागेचे नियोजन नसल्याने पदाधिकाऱ्यांनी प्रचंड गदारोळ केला. या गदारोळातच शहर मंडळ अध्यक्षाची निवडणूक पार पडली, तर ग्रामीण मंडळ अध्यक्षाची निवडणूक प्रक्रिया तूर्तास रद्द करण्यात आली.

# डॉ. बाबासाहेब आंबडेकर, महावीर, हनुमान जयंतीसाठी पोलिस सज्ज

## रॅली, शोभायात्रेत ज्वलनशील पदार्थ, शस्त्र बाळगल्यास खैर नाही

### शांतता समितीच्या बैठकीत सीपींचा इशारा

### रेकार्डवरील उपद्रवींवर पोलिसांची करडी नजर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती** – रमजान ईद, रामनवमी झाल्यानंतर आता शहर पोलिस आगामी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महावीर व हनुमान जयंतीसाठी सज्ज झाले आहे. त्यामुळे सीपी रेड्डी यांनी आज एप्रिल रोजी पोलिस आयुक्तालयाच्या सभागृहात शांतता समितीची बैठक घेतली. अमरावती शहराच्या जातीय सलोख्याचा इतिहास पाहता जयंती, उत्सवांचा काळ शांततेत पार पडले, असा विश्वास सीपी रेड्डींनी व्यक्त केला. तसेच शोभा यात्रे दरम्यान ज्वलनशील पदार्थ व शस्त्र बाळगणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल. यासाठी रेकार्डवरील उपद्रवींवर पोलिसांची करडी नजर राहणार असल्याचे देखील सीपी म्हणाले. तसेचसोशल मिडीयावर वादग्रस्त पोष्ट अपलोड करणाऱ्यांवर थेट गुन्हे करण्याची चेतावनी सुध्दा





सीपींनी दिली. शहरात १० एप्रिलला महाविर जयंती व १२ एप्रिलला हनुमान जयंती व १४ एप्रिलला डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी होणार आहे. या निमित्ताने शहरातील बहुतांश भागात मोठया प्रमाणात तिन्ह जयंती उत्सव साजरे करण्यात येतील. भव्य शोभा यात्रा काढण्यात येईल. ठिकठिकाणी महाप्रसादाचे आयोजन सुध्दा करण्यात येईल. यानिमित्ताने पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी आज पोलिस आयुक्तालयातील सभागृहात महाविर जयंती, हनुमान जयंतीवडॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त शांतता समितीची बैठक घेतली. बैठकीमध्ये मनपा, महावितरणसह सह सर्व संबंधीत विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जयंती उत्सवांच्या याकाळात शहरातील सर्व स्मारके पुतळे व मंदिरांची साफसफाई करण्यातयावी, अशासूचनादेखील सीपी रेड्डी यांनी दिल्या आहेत.

बैठकीमध्ये शहरातील सर्व पोलिस ठाण्याच्या हद्दीतील प्रतिष्ठित नागरिक, आयुक्तालय स्तरावरील शांतता समितीचे सदस्य, आयुक्तालयातील तिन्ही डीसीपी, एसीपी व ठाणेदार, सर्व शाखेचे पोलिस निरीक्षक उपस्थित होते. अमरावती शहर शांतप्रिय असून शांतता कायम राखण्यासाठी नेहमी सर्व समाजातील लोकांनी पोलिसांना सहकार्य केले आहे. त्यानुसार अशाच प्रकारे सर्व जातीय एकोपा कायम ठेऊन आगामी सर्व जयंतींचे उत्सव शांततेत पार पाडावे, असे आवाहन सीपी रेड्डींनी उपस्थितांना केले. जयंती उत्सवाच्या काळात शहरातील पाणी पुरवठा, विजपुरवठा खंडीत होणार नाही, शहरातील साफसफाईची मोहिम नियमित सुरू राहिल, याची काळजी सर्व संबधीत विभागांनी घेण्याचे देखील सीपी रेड्डींनी सांगितले. अशा जयंती उत्सवांच्या काळात सोशल मिडीयावर अफवा मोठ्या प्रमाणात व्हायरल होतात आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होते. शहरात असा कोणताही प्रकार घडून नये, यासाठी कुणीही कोणत्याही समाजाच्या भावना दुखावणारे आक्षेपार्ह मॅसेज, फोटो, व्हिडीओ व्हॉट अ‍ॅप, फेसबुक, ट्विटर, इन्टाग्रामसह कोणत्याही सोशल मिडीयावर अपलोड किंवा व्हायरल केल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात तात्काळकारवाईहोईल.

# २.१५ लाख लाभार्थी ई केवायसीपासून वंचित

## ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ, अन्यथा रेशन बंद होईल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती**– जिल्ह्यात ई-केवायसीसाठी शिधा पत्रिकाधारकांकडून संथ प्रतिसाद मिळत असल्याचे आकडेवारीवर नजर टाकल्यास दिसून येते. जिल्ह्यात १९ लाख ६० हजार ६७० लाभार्थ्यांपैकी १७ लाखांवर लाभार्थींची ई-केवायसी झाली आहे. मात्र, २ लाख १५ हजार ३०१ लाभार्थींची ई केवायसी अद्यापही बाकी असून, त्यांना ३० एप्रिलपर्यंत मुदत वाढवून देण्यात आली आहे. ही प्रक्रिया झाल्यास रेशनचा काळाबाजार कमी होणार आहे.

केंद्र सरकारकडून नागरिकांसाठी अनेक योजना राबवण्यात येतात. देशातील अनेक लोकांना सरकारी योजनांचा लाभ मिळत आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत या गरीब गरजू लोकांना अत्यंत कमी दरात रेशन पुरवले जाते. सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत शासनाकडून अंत्योदय व प्राधान्य गट कार्डधारकांना मोफत धान्याचे वितरण करण्यात येते. मात्र स्वस्त



धान्याचा काळाबाजार होत असल्याच्या अनेक घटना उजेडात येतात. त्यामुळे शासनाने रेशनच्या धान्याचे वाटप ई-पीओएस (इलेक्ट्रॉनिक पॉइंट ऑफ सेल) पद्धतीने करण्यास सुरुवात केली आहे. त्याअंतर्गत शिधापत्रिकांमध्ये समाविष्ट नावांचे आधार व्हेरिफिकेशन व ई-केवायसी केल्यानंतरच ई-पीओएस मशीनद्वारे धान्याचा लाभ मिळतो. याचा उपयोग रेशनच्या काळ्या बाजाराला आळा बसण्यासाठी होतो. परंतु अनेक शिधा पत्रिकाधारकांची ई-केवायसी होणे बाकी आहे. ई-केवायसी केल्यास मृत व बाहेरगावी राहणाऱ्या शिधापत्रिकाधारकांची नावे कार्डातून वगळण्यात येऊ शकतात.

अशी आहे अडचण ई-केवायसी करण्याची प्रक्रिया रेशन दुकानदारांमार्फत राबवण्यात येते. त्यासाठी कार्डात नाव असलेल्या प्रत्येक लाभार्थींची ई-केवायसी करण्यात येत आहे. मात्र रेशन कार्ड मॅनेजमेंट सिस्टिमचे काम सुरू असल्यास संकेतस्थळाची गती कमी होते. त्याचा परिणाम ई-केवायसीची प्रक्रिया संथ होत आहे.

# चिमुकलीशी चौपन्न वर्षीय इसमाचे अश्लील चाळे आरोपी अटकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९धामणगाव रेल्वे** :-शहरातील एका निवासी भागात चार वर्षीय चिमुरडी घरासमोर खेळत असतांना खाण्याच्या बहाण्याने आपल्या घरात बोलावून अश्लील कृत्य करण्याचा प्रयत्न केल्याची घृणास्पद घटना मंगळवारला (ता.८) भरदुपारी घडली आहे.

दुपारी २ वाजताच्या सुमारास चार वर्षीय चिमुकली घराबाहेर खेळत असतांना लोकांची वर्दळ कमी असल्याने आरोपी नरेश देविदास चौधरी (५४) याने खोबरं खाण्याला देतो असा बहाणा करून त्या लहान मुलीला घरात बोलावले.त्याने चटई टाकून आपण खेळ खेळूया असा बहाणा करून त्या चिमुरडीला चटईवर लेटवले व तिच्याशी अश्लील कृत्य करण्याचा प्रयत्न केला. केलेल्या कृत्यावर घरात कुणाला सांगू नकोस असेही तीला बजावले.दरम्यान घरी परतल्यावर आईने मुलीला विचारणा केली असता लहानग्या मुलीने घडलेला प्रकार आपल्या आईला सांगितला. दरम्यान कुटुंबियांनी दत्तापुर पोलीस स्टेशन गाठून पोलिसांत तक्रार दाखल केली.

आरोपी नरेश देविदास चौधरी याला अटक करून विनयभंगासह बाल संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची भावना दिसून येत असून अश्या प्रकारच्या घटना स्थानिक भागातील सुरक्षिततेला धोका निर्माण करतात.अधिक तपास दत्तापुर ठाण्याचे ठाणेदार गिरीश ताथोड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस करीत आहे.

# हंगामापूर्वीच झटका, खत दरवाढीचा फटका१०:२६:२६ या खताची बॅगमागे २५५ रुपयांनी दरवाढ, डीएपीही महागणार

विदर्भ प्रजासत्ताक
दि.९अमरावती



जूनपासून खरीप हंगाम सुरू होत असला तरी त्यापूर्वीच शेतकऱ्यांना रासायनिक खतांच्या दरवाढीचा झटका शासनाने दिला आहे. डीएपीमध्ये १५० रुपयांची वाढ प्रस्तावित असताना १०:२६:२६ खताचे दर २५५ ते २७५ रुपयांपर्यंत वाढविण्यात आलेले आहे. बीटी बियाण्यांची ३७ रुपयांनी दरवाढ झालेली आहे, आता कीटकनाशकांचेही दर ५ ते १० टक्क्यांनी वाढण्याची चर्चा होत आहे.

दरवर्षी शेतीपिकांचा उत्पादनखर्च वाढत असताना त्यातुलनेत उत्पन्नं होत नसल्याने शेतीचे समीकरणच बिघडले आहे. यंदा खरिपापूर्वीच रासायनिकखतांच्या दरवाढीला सुरुवात झालेली आहे. खतांची रॅक लागल्यावर यावेळेस खतांचा भाव काय राहील, हे निश्चित होत आहे. यावर्षी डीएपीची (डाय अमोनियम फॉस्फेट) दरवाढ होणार असल्याची चर्चा होत आहे. सध्या डीएपीचे दर १३५० रुपये प्रतिबॅग आहेत. यामध्ये १५० रुपयांची दरवाढ होण्याची शक्यता आहे. या खतावरील अनुदान बंद करून दर वाढविण्याचा घाट रचला जात आहे. महिनाभरापासून १०:२६:२६ या खताचे दर १४७० रुपयांवरून १७२५ ते १७५० रुपयांवर पोहोचले आहे. कपाशीसोयाबीनसह बगिच्यासाठी या खताचा वापर शेतकरी मोठ्या प्रमाणात करतात. त्यातच आता खतांचे दर वाढल्याने उत्पादन खर्चात वाढ होत आहे.

### कीटकनाशकांचीही दरवाढ

केंद्रशासनाने बीटी बियाण्यांची प्रतिबॅग ३७ रुपयांनी वाढ केल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात साडेपाच कोटींनी वाढ झाली आहे. शिवाय कीटकनाशकांच्याही दरात ५ ते १० टक्क्यांनी वाढ होण्याची शक्यता असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

### खतासोबत लिंकिंग

रासायनिक खतांसोबत कंपन्यांद्वारे दुय्यम खतांची लिंकिंगचा प्रकार वर्षभरापासून सुरूच आहे. याबाबत विक्रेत्यांद्वारा तक्रार होत नसल्याने कृषी विभागाद्वारा कारवाई करण्यात येत नाही. परंतु हे दुय्यम दर्जाचे खत विक्रेत्यांद्वारा शेवटी शेतकऱ्यांनाच विकण्यात येते.

# वीज ग्राहक आणि महावितरणशी बांधिलकी ठेवा; निर्धारपूर्वक केलेल्या प्रयत्नांना योग्य नियोजनाची व अभ्यासाची जोड दिल्यास यश निश्चित मिळतेच : ज्ञानेश कुलकर्णी

## ग्राहकसेवा आणि वीज बिल वसुलीसाठी कौतूकाची थाप

विदर्भ प्रजासत्ताक
दि.९अमरावती



आजच्या युगात विजेशिवाय जगण्याची कल्पनाही करू शकत नाही, त्यामुळे वीज क्षेत्रात काम करीत असताना ग्राहकांना अखंडित आणि दर्जेदार वीज पुरवठा तसेच उत्तम ग्राहक सेवा देण्याचे कर्तव्य पार पाडीत असताना ग्राहकांनाही वेळेवर वीज बिल भरण्याची सवय लावून व शंभर टक्के वसुली करून महावितरणच्याप्रति असलेली बांधिलकी जोपासा.२४ तास निरंतर अखंडित सेवेची मागणी असणारे वीज क्षेत्र असो किंवा अन्य कोणतेही क्षेत्र असोनिर्धारपूर्वक केलेल्या प्रयत्नांना योग्य नियोजनाची व अभ्यासाची जोड दिल्यास यश निश्चित मिळते असे प्रतिपादन करत मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी जिल्ह्यातील उत्कृष्ट कामगिरी करणारे अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र अमरावती येथे (दि.७) अमरावती मंडळ कार्यालयाव्दारे आयोजित आर्थिक वर्ष २०२४ -२५ मध्ये उत्कृष्ट काम करणारे अधिकारी व कर्मचारी यांच्या कौतूक सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून अधीक्षक अभियंता दिपक देवहाते, सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशमुख आणि वरीष्ठ व्यवस्थापक वित्त व लेखा विजय पचारे यांची प्रमुख उपस्थिती होती. महावितरणच्या नागपूर प्रादेशिक कार्यालयाच्या अंतर्गत असलेल्या ५ परिमंडळामध्ये वीज पुरवठा, ग्राहक सेवा, वीज बिल वसूली अश्या विविध मापदंडावर पूर्व विदर्भ आणि पश्चिम विदर्भ यांच्या कामगिरीमध्ये तफावत आढळते. तुलनेने पूर्व विदर्भातील महावितरणची कामगिरी सरस असून विजबिल वसूलीही कायम १००%, विनासायास आणि वेळेवर होते.महावितरणच्या पश्चिम विदर्भातील अधिकारी व कर्मचारी यांनी महावितरणचे हित सर्वतोपरी ठेवून आपले कर्तव्य निष्ठेने पार पाडल्यास आणि थोडी जास्त मेहनत केल्यास संपूर्ण विदर्भ प्रांताची कामगिरी उंचावेल यात शंका नाही.यावेळी बोलतांना अधीक्षक अभियंता दिपक देवहाते म्हणाले की, महावितरणमध्ये काम करतांना एकाच वेळी सुरळीत वीज पुरवठ्यासोबत मुदतीत नविन वीज जोडणी,फॉल्टी मिटर बदलविणे, वीज हानी कमी करणे, देखभाल दूरूस्ती,ग्राहकांच्या तक्रारीचे निवारण, वीज बिल वसुली यासोबतच अनेक तांत्रिक मापदंडावर काम करावे लागते.प्रत्येकांनी आपले काम वेळेत केल्यास ग्राहकांना समाधान मिळते आणि महावितरणची प्रगती.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्यवस्थापक कल्पना भुले यांनी केले, कार्यक्रमाला एका सुत्रात गुंफण्याचे काम आद्यश्री कांबे यांनी केले. तसेच सुत्रसंचालन आणि कार्यक्रमच्या उत्कृष्ट आयोजनाची संपूर्ण तयारी व्यवस्थापक विकास बांबल यांनी केली, तर आभार उपकार्यकारी अभियंता ज्ञानेश्वर अंबाडकर यांनी मानले. कार्यक्रमाला अधिकारी अभियंते व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ...तब्बल तीन दशकांनी रंगली 'दिल दोस्ती दुनियादारी' महाविद्यालयाचे ऋण फेडण्याचा माजी विद्यार्थ्यांचा संकल्प

विदर्भ प्रजासत्ताक
दि.९अमरावती




व्हॉट्स प, फेसबूक आणि इन्स्टाग्राम ही माध्यमे मानली तर टाईमपास आणि चांगला उपयोग केला तर लाखमोलाची. याचीच प्रचिती अमरावतीच्या शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात शिकणाऱ्या माजी विद्यार्थी व शिक्षकांना आली. १९९० ते १९९६ दरम्यान या महाविद्यालयातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी आठवणींना उजाळा देण्यासाठी स्नेहमेळावा ठरवला. सोशल मीडियाचा वापर करून सवंगड्यांना सांगावा पाठवला. त्यास प्रतिसाद देत सर्वांनी महाविद्यालयात धाव घेतली अन् तब्बल तीन दशकांनंतर रंगली तरूणपणाच्या भावविश्वातील 'दिल दोस्ती दुनियादारी'...शासकीय तंत्रनिकेतनमधून शिकलेले अनेक विद्यार्थी आता पुणे, मुंबई, बंगळुरू आदी ठिकाणी स्थायिक झाले. त्यांनी विविध क्षेत्रात नोकरी, व्यवसायाच्या माध्यमातून आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. काही विद्यार्थी विदेशात उच्च पदावर काम करीत आहेत. सोशल मीडियातून पुन्हा वर्गमित्र, मैत्रिणींचा संपर्क झाला. व्हॉट्स पवर सर्व एकत्र आले. गप्पा रंगू लागल्या. आठवणी ताज्या झाल्या. मग पुन्हा भेटून धमाल करण्याची इच्छा अनेकांनी व्यक्त केली. आणखी सवंगड्यांचे क्रमांक मिळवले. त्यांनाही ग्रूपमध्ये ड केले. सर्वानुमते दिवस ठरला. स्थानिक विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाची तयारी केली. त्यावेळचे अनेक शिक्षक निवृत्त झालेले. काही शहराबाहेर, तर काही शहरातच होते. त्यांचा पत्ता शोधला, संपर्क केला, आमंत्रण दिले. ठरल्यादिवशी सर्व एकत्र आले.महाविद्यालयातच स्नेह सोहळा आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. विजय मानकर हे होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी मंत्री प्रवीण पोटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता गिरीश जोशी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रतीक गिरी, शासकीय तंत्रनिकेतन माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष सिद्धार्थ वानखडे, सचिव मिलिंद आंबटकर, उपाध्यक्ष संजय बालपांडे सहसचिव राहुल मोरे प्रामुख्याने उपस्थित होते.कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. वसंत जपे, प्रा. मनोज ढोक,प्रा. ओंकार सरोदे, प्रा.पी वी सरोदे,प्रा.हेमंत जोशी, प्रा सारडा सर, प्रा यंगलवार सर, प्रा योगेश गायकी ,प्रा गुल्हाने सर प्राध्यापकांचा विद्यार्थ्यांनी सन्मान केला. अनेकांनी आठवणी सांगितल्या. शिक्षकांनीही आठवणींना उजाळा देत विद्यार्थ्यांच्या आनंदात सहभाग घेतला. नंतर सर्व माजी विद्यार्थी आपल्या पूर्वीच्या बेंचवर वर्गात बसले. पुन्हा तोच धिंगाणा घालत आठवणींना वाट मोकळी करून दिली. कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते.ज्या महाविद्यालयातून आपण शिकलो मोठे झालो त्या महाविद्यालयातील व गुरुजनांप्रती ऋण व्यक्त करण्यासाठी व हल्ली महाविद्यालयात शिकत असलेल्या गरीब, होतकरू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्यासाठी माजी विद्यार्थी संघटनेची स्थापना करण्यात आली असून या संघटनेतर्फे स्नेहसोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.देशभरातीलच नव्हे तर विदेशातून देखील दोनशेच्यावर विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाला हजेरी लावली. स्नेह सोहळ्या नंतर माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपले अनुभव, यश-अपयशाचे बारकावे समजावून सांगितले.

### समाजाचे ऋण फेडण्याची संधी : प्रवीण पोटे

आपल्या महाविद्यालया विषयीचे ऋण फेडण्याची संधी माजी विद्यार्थ्यांना मिळाली आहे. या मेळाव्याच्या अयोजनामुळे एक नवीन दिशा मिळणार आहे. गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थी संघटनेच्या मार्फत मदत करावी, असे आवाहन माजी मंत्री प्रवीण पोटे यांनी केले.वसतीगृहाच्या विस्तारीकरणासाठी प्रयत्नमहाविद्यालयातील विद्यार्थ्यांची संख्या आता वाढली आहे. सध्याचे वसतीगृह अपुरे पडत असल्याने वसतीगृहाच्या विस्तारीकरणासाठी पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष सिद्धार्थ वानखडे यांनी दिले.यावेळी शासकीय तंत्र निकेतन महाविद्यालयाची रंगरंगोटी व कामाची दुरुस्ती तातडीने करून दिल्याबद्दल सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रतीक गिरी यांचा माजी विद्यार्थ्यांनी स्मृतिचिन्ह व शाल श्रीफळ देऊन सत्कार केलावेगवेगळ्या क्षेत्रात काम करीत असताना जीवनात यश मिळवले असले तरी त्यामागे महाविद्यालयाचे संस्कार आहेत, अशी भावना अनेक माजी विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यकारी सदस्य अनिल पमनाणी,जयंत तायवाडे, शशिकांत रोडे, संजय शेंडे, धर्मेंद्र सोनी,उमेश गावंडे,अपर्णा राठोड, दुर्गा पंचगाम,वंदना जोशी,संजय खर्चे,रवी भुतडा, प्रवीण रेवतकर,प्रकाश नंदनवार, प्रा.निशांत भोरे, प्रा. राहुल उंबरकर,प्रा प्रमोद पाटील यांनी प्रयत्न केले.

# वाकी रायपूर येथील पिण्याच्या पाण्याची टाकी बनली शोभेची वस्तू

### पाणीपुरवठा सुरू करण्याची नागरिकांची मागणी



विदर्भ प्रजासत्ताक
दि.९अमरावती

भातकुली तालुक्यातील वाकी रायपूर येथे जल जीवन मिशन अंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा ची पिण्याच्या पाण्याची टाकी चे बांधकाम गेल्या तीन महिन्या पूर्वी पूर्ण होऊन सुद्धा संबंधित ठेकेदाराने पाईपलाईन जोडली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे,महाराष्ट्र जीवन प्राधिकार्यांच्या संबंधित अधिकाऱ्यांनी तात्काळ पिण्याच्या पाण्याच्या टाकीमध्ये पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा अशी मागणी नागरिकांनी केली आहे.सध्या उन्हाळयाचे दिवस सुरू असून या दिवसात चार दिवसा आड गावाला पिण्याचे पाणी देण्यात येते त्यामुळे सम्पूर्ण गावात पिण्याच्या पाण्यासाठी गावकऱ्यांना भटकंती करावी लागते.गावात ५० हजार लिटर क्षमतेची ही टाकी मात्र य टाकीतील पाणी कमी पडत आहे.गावकऱ्यांनी अनेक वेळा मागणी केल्यानंतर दुसरी टाकी बांधण्यात आली मात्र त्या टाकीत सध्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली नाही ही या टाकीमधून पाण्याची व्यवस्था करण्यात आली तर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निकाली लागू शकतो असे गावकऱ्यांचे म्हणणे आहे.

# विद्यापीठाची पर्यावरणीय अभ्यास विषयाची उन्हाळी -२०२५ परीक्षा महाविद्यालय स्तरावर १६ जून रोजी होणार

## विद्यार्थ्यांनी नोंद घेण्याचे विद्यापीठाचे आवाहन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.९अमरावती

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची पर्यावरणीय अभ्यास विषयाची उन्हाळी - २०२५ परीक्षा १६ जून, २०२५ रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत महाविद्यालय स्तरावर घेण्यात येणार आहे. परीक्षेस पात्र असलेल्या व परीक्षा आवेदनपत्र भरलेल्या उन्हाळी - २०२५ मध्ये प्रवेशित होणा-या सत्र/सी.जी.एस./सी.बी.एस.एस. पध्दतीमधील विद्याथ्र्यांची (विधी व बी.व्होकसह) लेखी परीक्षा उपरोक्त तारीख व वेळेत महाविद्यालय स्तरावर विद्यापीठाव्दारे पुरविण्यात येणा-या प्रश्नपत्रिकांनुसार होईल, असे परीक्षा व मूल्यमापन विभागाकडून कळविण्यात आले आहे.

उपरोक्त परीक्षेच्या सर्व संबंधित विद्याथ्र्यांना पर्यावरणीय अभ्यास या आवश्यक विषयाच्या प्रश्नपत्रिकेच्या वेळापत्रकाची माहिती देण्यात यावी. तसेच सत्र/सीजीएस (सीबीसीएस लागू होण्याच्या पूर्वीचे विद्यार्थी) पध्दतीच्या अभ्यासक्रमाच्या परीक्षा संचालनानंतरची पुढील कार्यवाही महाविद्यालयांनी करावी.



सी.बी.सी.एस. अभ्यासक्रमांच्या पर्यावरणशास्त्र विषयाची परीक्षा ह्या संबंधित अभ्यासक्रमांच्या निदेशानुसार संचालित करण्यात येत आहेत. सदर परीक्षा ह्या विद्याथ्र्यांना देण्यात आलेल्या परीक्षा केंद्रांवर विद्यापीठामार्फत पुरविण्यात आलेल्या प्रश्नपत्रिकांनुसार घेण्यात येईल. सदर परीक्षेच्या वेळी विद्याथ्र्यांनी त्यांना देण्यात आलेले प्रवेशपत्र सोबत आणावे. सी.बी.सी.एस. पध्दतीमधील पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्याथ्र्यांनी सोडविलेल्या उत्तरपत्रिका परीक्षा केंद्रांनी इतर विषयांच्या उत्तरपत्रिकांप्रमाणेच विद्यापीठात जमा करावयाच्या आहेत. सदर विषयांचे मूल्यांकन विद्यापीठाच्या केंद्रीय मूल्यांकन कार्यक्रम केंद्रात होईल. त्याचबरोबर अभियांत्रिकी व तांत्रिकी विद्याशाखेतील बी.आर्च सत्र-४ (सी.बी.सी.एस.) पध्दतीमधील परीक्षा योजनेत पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रमाचा विषय दर्शविला नसल्यामुळे सदर विषयाची उन्हाळी-२०२५ ची लेखी परीक्षा अभियांत्रिकी व तांत्रिकी शाखेतील इतर अभ्यासक्रमांच्या वेळापत्रकात दर्शविल्यानुसार दि. ३० मे, २०२५ रोजी सकाळी ९.०० ते १२.०० या वेळेत होईल. परीक्षा संचालनानंतरची पुढील कार्यवाही तरतुदीनुसार महाविद्यालयांनी करावी.

यासंदर्भात सर्वसंबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, विभाग प्रमुख, महाविद्यालये, विद्यापीठ शैक्षणिक विभाग यांना परीक्षा विभागाकडून कळविण्यात आले असून महाविद्यालयांनी याची तातडीने आपल्या विद्याथ्र्यांना जाणीव करुन द्यावी. तसेच विद्याथ्र्यांनी सुध्दा याची नोंद घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता परीक्षा विभागाच्या अधिका-यांशी विद्यापीठ वेबसाईटवरील त्यांच्या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

# यंदा कर्तव्य ! ११ महिन्यांत राहतील ८० लग्नतिथी; होऊ द्या लग्न धूमधडाक्यात, मे महिन्यात १४ तिथी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**

वधू-वरांसाठी आनंदाची बातमी आहे. पंचांगकर्त्यांनी नववर्षातील ११ महिन्यांमध्ये तब्बल ८० लग्नतिथी जाहीर केल्या आहेत. त्यामुळे अनेक कुटुंबांच्या आनंदाला आता उधाण येणार आहे. एक लग्नतिथी ठरवा आणि होऊन जाऊ द्या धूमधडाक्यात लग्न, असा उत्साह सर्वत्र पाहायला मिळत आहे. हॉल बुकिंग, केटरिंग, वाजंत्री, मेहंदी, मंडप अशा साऱ्या सेवांमध्ये चैतन्य जाणवू लागले आहे.



**घरातील सर्वांचा विचार करा, मगच निवडा तिथी**

सर्वप्रथम मुख्य काळातील लग्नतिथींचा विचार करावा. शक्य नसेल तर गौणकाळ, आपत्कालीन स्थितीतील लग्नतिथींची निवड करावी. घरात आजारी, त्यांच्या हयातीत मुलाचे, नातवाचे लग्न करायचे आहे किंवा नवरदेव-नवरींना सुटी मिळत नाही, घरातील मुलांच्या परीक्षा किंवा नातेवाइकांचे कार्यक्रम लक्षात घेता गौण तिथी निवडावी, असे पंचागतज्ज्ञ मनोहर निंबार्ते यांनी सांगितले.

**एप्रिल महिन्यात ८ तिथी**

यंदा १४ एप्रिलपासून लग्नसराईला सुरुवात होत आहे. या चालू महिन्यातच ८ लग्नतिथी आहेत, तर सर्वाधिक १४ लग्नतिथी मे महिन्यात आहेत.त्यामुळे लग्न जुळलेल्या घरात आनंद व उत्साहाचे वातावरण पाहावयास मिळत आहे.लग्नतिथी काढण्यावर भर दिला जात आहे. सध्या बाजारात एप्रिल, मे महिन्यातील लग्नाच्या पत्रिकांची छपाई सुरू आहे. सोने महागल्याने सराफा बाजार थोडा थंडावला आहे. खरेदीसाठी कापड बाजारात सध्या धूम आहे. दुकानांमध्ये सकाळपासून गर्दी दिसून येत आहे.

**जून ते डिसेंबर महिन्यातील लग्नतिथी याप्रमाणे**

जून - १०, १२, १६, १९, २०, २१
जुलै - २, ३, ४, ५, ७, ९, १२
ऑक्टोबर - २६, ३०, ३१
नोव्हेंबर - ३, ४, ७, १३, १५, १६
डिसेंबर - १२, १३, १५
जानेवारी (२०२६) - २०, २३, २४, २५, २६

# नशा मुक्त भारत अभियान अंतर्गत शालेय स्तरावर अमली पदार्थाच्या वापरा

## विरोधी जनजागृती साठी उपाययोजना करण्याचे शिक्षण विभागाचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**



भारत सरकारच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागाने नशा मुक्त भारत अभियान अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थाच्या वापराविरोधी जनजागृती करण्यासाठी विविध उपाय योजना हाती घेण्याबाबत निर्देश दिले आहे. अमली पदार्थाचे सेवन आणि तस्करीवर उपाय म्हणून शालेय स्तरावर व्यापक जागरूकता कार्यक्रम आवश्यक असल्याचे सांगितले आहे. त्यास अनुसरून जिल्ह्यातील सर्व प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्यामार्फत त्वरित कार्यवाही करण्यात यावी.अश्या प्रकारचे आदेश डायट अमरावती आणि प्राथमिक,माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी जिल्हातील गटशिक्षणाधिकारी यांना दिले आहे.शिक्षकांनी नश्या मुक्तीचे धडे शिक्षकांना विद्यार्थांना दयावे लागणार आहे.विविध उपक्रमाने व त्याची लिंक भरण्याला आता मुख्याध्यापक,शिक्षक कंटाळे असुन अश्या उपक्रमावर शिक्षक,मुख्याध्यापक बहीष्कार टाकण्याच्या तयारीत आहे.महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने शिक्षकांकडे शैक्षणिक व अशैक्षणिक कामे कोणती याचा शासन आदेशच काढले आहे.

शालेय स्तरावर अमली पदार्थ विरोधी जनजागृती कार्यक्रम राबविणे विद्यार्थ्यांना अमली पदार्थाच्या धोक्यापासून दूर ठेवण्यासाठी प्रभावी जनजागृती करण्याची आवश्यकता आहे. त्या अंतर्गत विविध कार्यक्रम शाळांमध्ये राबविण्यात यावेअसे आदेश दिले आहे.जेणेकरून तुमच्या मार्फत आलेला अहवाल राज्यावर सादर करणे शक्य होईल.विविध विषयाच्या अनुषंगाने आपल्या स्तरावरून शाळा, मुख्याध्यापक, शिक्षक यांना आदेशित करावे पालक, शालेय व्यवस्थापन समिती यांना अवगत करावे.असे आदेश शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, अमरावती,शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, अमरावती,प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अमरावती यांनी दिले आहे.

# दिव्यांग बांधवांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**

दिव्यांग बांधवांचा जलद गतीने विकास व्हावा म्हणून केंद्र व राज्य शासनाने वेगवेगळ्या योजना राबविल्या आहे त्या योजनांचे लाभ अपंगांना मिळावे या करिता शासनाने शासन निर्णय सुद्धा निर्गमित केले आहे. परंतु काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपनामुळे या योजना व सवलती पासून अपंग वंचित राहत आहे. त्या करिता अपंग जनता दल सामाजिक संघटनाचे संस्थापक अध्यक्ष तथा अपंग नेते शेख अनिस पत्रकार यांच्या नेतृत्वात आज जिल्हाधिकारी कार्यालयावर शेकडो दिव्यांग धडकले.यावेळी जोरदार घोषणाबाजी ही करण्यात आली.

**या होत्या मुख्य मागण्या**

१) संजय गांधी निराधार योजनेचे मानधन तत्काळ अपंग निराधारांच्या खात्यात जमा करण्यात यावे.

२) अपंग निराधार योजनेचे मानधन दरमहा ६०००/- करण्यात यावे.

३) निराधार योजनेसाठी राज्य शासनाने सुरु केलेली उद्धढ प्रणाली रद्द करण्यात यावी.



या सह अन्य मागण्याचे निवेदन ही जिल्हाधिकारी यांना देण्यात आले.यावेळीसुधाकर काळे (जेष्ठ अपंग नेते), राजिक शाह (राज्य महासचिव), मयूर मेश्राम (जिल्हाध्यक्ष ),धनश्री पटोकार (महिला जिल्हाध्यक्षा,रहल वानखडे (जिल्हा सचिव)जहीर खान (जिल्हा उपाध्यक्ष), इसराइल (अपंग सेवक),अब्दुल समीर (अपंग सेवक),कांचन कुकडे (जिल्हा महासचिव),शेख बब्बू (अम. शहराध्यक्ष ,शेख रुस्तम (जिल्हा उपाध्यक्ष,अजय वाहूरवाघ, प्रभाकर राऊत, राजेंद्र घाटोळे,प्रमोद शेबे,निकिता कावरे, मो. राजिक,नसीर बेग उपस्थित होते.

# पाणीदार फळांसह बीट, काकडी, गाजरला मागणी

## १५ दिवसांत काकडीचे दर १० रुपयांनी वधारले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**

जिल्ह्यात तापमानाचा पारा ४२अंशावर गेला आहे. तीव्र उष्णतेमुळे शरीराला थंडावा देणाऱ्या भाज्यांची मागणी वाढली आहे. भंडारा शहर व ग्रामीण भागात नागरिक गाजर, बीट आणि काकडी यांसारख्या रसदार भाज्यांकडे अधिक प्रमाणात वळताना दिसत आहेत. उन्हाच्या तडाख्यात शरीराला शीतलता देणाऱ्या काकडीची मागणी मोठी असून, आवक मंदावल्याने १५ दिवसांत काकडीने भाव १० रुपयांनी वधारले आहे.

सध्या काकडी ४० रुपये प्रतिकिलो दराने विकली जात आहे. मागणी अधिक आणि आवक कमी आहे. सध्या काकडीचा पुरवठा जास्त असल्याने दर वाढले आहेत. तापमान जसजसे वाढत जाईल, तसतशी काकडीच्या दरात वाढ होण्याची शक्यता आहे. मोठा बाजारबीटीबी सब्जीमंडी व आठवडी भाजी बाजारात काकडीची मोठ्या प्रमाणात विक्री होत आहे.



**तापमानामुळे मागणीत वाढ**

पाणीदार फळभाज्यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली असली तरीही त्या सध्या सामान्य ग्राहकांच्या आवाक्यात आहेत; परंतु कडक उन्हामुळे सध्या काकडीची आवक मंदावली आहे; परंतु मागणी वाढल्याने बाजारात बाहेरजिल्ह्यांतून आयात केली जात आहे. काकडीत २५ टक्के पाणी असल्याने शरीराला हायड्रेट ठेवते. शरीरातील उष्णता कमी करून उष्माघात टाळण्यास मदत करते. फायबर आणि अँटीऑक्सिडंट्सचा उत्तम स्रोत आहे.

**काकडीत २५ टक्के पाणी, आरोग्यदायी फायदेही**

उष्णतेच्या झळा आणि आरोग्यदायी उपाय उष्णतेचा मुकाबला करण्यासाठी आहारतज्ज्ञांनी थंडावा देणाऱ्या पदार्थांचा आहारात समावेश करण्याचा सल्ला दिला आहे. काकडीत २५ टक्के पाणी असल्याने शरीराला हायड्रेट ठेवते. शरीरातील उष्णता कमी करून उष्माघात टाळण्यास मदत करते. फायबर आणि अँटीऑक्सिडंट्सचा उत्तम स्रोत असल्याने पचनास मदत होते.

# उन्हामुळे दुपारी रस्त्यांवरील वर्दळ झाली कमी

## शेतकामांवरही झाला परिणाम : उन्हाळी कामे सकाळीच

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**

मागील काही दिवसांपासून जिल्ह्याचा पारा ४२,४३ अंशावर पोहोचला आहे. त्यामुळे नागरिकांना तप्त उन्हाचा सामना करावा लागत आहे. दिवसा बाजारपेठेवरही उन्हाच्या झळांचा परिणाम बघायला मिळत आहे. दुपारच्या वेळी रस्त्यांसह बाजारपेठेत वर्दळ घटल्याने चित्र सध्या दिसत आहे.



यंदाचा उन्हाळा कडक असल्याने मार्च महिन्यापासून काही प्रमाणात झळा सोसाव्या लागत आहेत. सकाळी आठ-नऊ वाजल्यापासूनच उन्हाचा चटका जाणवत आहे. त्यामुळे सकाळच्या सत्रात आपली कामे आटोपण्यावर बहुतांश नागरिकांचा भर आहे. उन्हामुळे बाजारपेठेत शुकशुकाट असल्याचे चित्र आहे. मागील आठवड्यात अवकाळीमुळे वातावरणात गारवा निर्माण झाल्याने तापमानात घट झाली होती. मात्र आता पुन्हा तापमान वाढत आहे. दुपारच्या वेळी ग्राहक फिरकत नसल्याने विक्रेत्यांनाग्राहकांची प्रतीक्षा करावी लागत आहे.

**शेतकामावर परिणाम**

सध्या रब्बी हंगाम संपला असून, शेतकरी येणाऱ्या खरीप हंगामासाठी शेत मशागतीच्या कामाकडे वळला आहेत. शेतात नांगरणी, वखरणी, शेणखत टाकण्याबरोबरच, कपाशी पहाटी वेचणीवर भर देत आहेत. मात्र, उन्हामुळे शेती कामावरही परिणाम होत आहे. सकाळपासून उन्हाचे चटके बसण्यास सुरुवात होत असल्याने सकाळच्या सत्रात काम करण्यावर भर देत आहे.

**शीतपेयांच्या दुकानात ग्राहकांची गर्दी**

उन्हापासून दिलासा मिळण्यासाठी शीतपेयांचा आधार घेतला जात आहे. लस्सी, ताकासह लिंबू सरबत, उसाचा रस या पेयांच्या मागणीत वाढ झाली आहे. बाजारपेठेत गर्दी कमी असताना शीतपेयांच्या दुकानात ग्राहकांची गर्दी पाहायला मिळत आहे. विशेषतः सायंकाळच्या वेळी मोठी गर्दी होत आहे.

# जारमधून शुद्धऐवजी केवळ थंड पाण्याचा होतोय भडिमार

## शासकीय, निमशासकीय कार्यालये, दुकानांमध्येही वापर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**

जिल्ह्यात पर्जन्यमान कमी झाल्याने भूगर्भातील पाण्याने तळ गाठला आहे. अशाही स्थितीत जिल्ह्यात, शहरासह ग्रामीण भागातही मिनरल वॉटरच्या नावाखाली अशुद्ध पण; थंडपाणी विक्रीचा गोरखधंदा चांगलाच फोफावला आहे. यावर प्रशासनाचेही नियंत्रण नसल्याने पाण्याचे जार विक्रीची गल्लीबोळात दुकानदारी थाटण्यात आली आहे. कमी खर्चात, कमी जागेत चांगले उत्पन्न देणारा व्यवसाय म्हणून आता पाणी विक्रीकडे बघितले जात आहे.

सुरुवातीला शुद्धीकरणाचे प्लान्टटाकून मिनरल वॉटरचे जार विकणारे मोजकेच व्यावसायिक होते. परंतु, भूगर्भातील पाणी उपसून केवळ थंड करून विकण्याला जास्त खर्च लागत नसल्याने आता पाणी विक्रीचा व्यवसाय शहरासह ग्रामीण भागात गल्लोगल्ली पहावयास मिळतो. यात पाण्याच्या शुद्धतेबाबत कोणतीही उपाययोजना केली जात नाही. बोअरवेलद्वारे आलेले पाणी थोडेफार शुद्ध करून मशिनद्वारे थंड करून जारमध्ये भरले जाते. एक जार सध्या तीस ते चाळीस रुपयांस विकला जात आहे. नागरिकही दिवसेंदिवस या थंड पाण्याची मागणी करीत असल्याने पाणी विक्री जोरात आहे.



**तिसऱ्या दिवशी बदलते पाण्याची चव**

थंड पाण्याच्या हव्यासापोटी चव नसली तरीही नागरिकांकडून पाण्याची मागणी होत आहे. दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी या पाण्याची चव आपोआप बदलत असल्याने पाण्याची शुद्धता व गुणवत्ता लक्षात येते. या गुणवत्तेसंदर्भात जारवर कोणतीही माहिती नमूद केलेली नाही. त्यामुळे आता जारच्या पाण्याची गुणवत्ता तपासण्याची गरज आहे.

**पाणी थंड करण्यासाठी रसायनांचा वापर**

वापरले जाणारे जारचे पाणी मशीनमध्ये थंड न करता इथलीन ग्लायकॉलसारखा पदार्थ पाण्यात टाकून पाण्याचा फ्रीझिंग पॉईंट डाऊन करून पाणी त्वरित थंड करण्यात येते. तेच पाणी लग्नांमध्ये व सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये वापरण्यात येते. त्याच्यापासून लोकांना उलटी, मळमळ, किडनीचे आजार, ह्दयाचे आजार असे गंभीर स्वरूपाचे आजार निर्माण होण्याचा धोका निर्माण झालेला आहे.

# विधवा महीलेच्या कुंटूबाला त्रास देणाऱ्यांवर कठोर कार्यवाही करुन पिडीत कुटुंबाला न्याय द्या

## राष्ट्रिय चर्मकार महासंघातर्फे जिल्हाधिकारी व ग्रामिण पोलिस अधिक्षकांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**

चांदुरबाजार तालुक्यातील शिरजगाव बंड येथील रहिवाशी असलेल्या श्रीमती यमुनाबाई रमेशराव रावळे या चर्मकार समाजातील विधवा महीलेच्या कुंटूबाला त्रास देणाऱ्या समाजकंटकावर कार्यवाही करुन पिडीत कुंटूबाला न्याय देण्यासंदर्भात राष्ट्रिय चर्मकार महासंघातर्फे जिल्हाधिकारी व ग्रामिण पोलिस अधिक्षक यांना निवेदन देऊन कठोर कार्यवाही करण्याच्यासंदर्भात मागणी करण्यात आली.

मौजे शिरजगाव बंड येथील सर्वे न २०२/१ व २०२/२ व मौजे जमापूर सर्वे न १९ मधील प्लॉट क्र १४५ व प्लॉट क्र. १४२ हे दोन्ही प्लॉट मागील चाळीस ते पंचेचाळीस वर्षापासून त्यांच्या मालकीचे व ताब्यात आहे. मात्र गावातील काही समाजकंटक जुन्या वादातून राजकीय हस्तक्षेप करून त्यांना व त्यांच्या परिवाराला वरील नमूद प्लॉट मधून बेदखल करण्याच्या उद्देशाने सरकारी कार्यालयात वेगवेगळ्या तक्रारी देतात.हा परिवार दलीत चर्मकार



असल्यामुळे सदर प्लॉट खाली करण्यासाठी स्थानिक स्वराज्य कार्यालयातून दबाव आणत आहे.मात्र त्यांचे प्रयत्न असफल झाल्यामुळे ते लोक आता शेवटच्या टोकाला पोहचले आहे. व त्या परिवाराला एकप्रकारे वाडीत टाकण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.तसेच हे लोक वारंवार जातीवाचक शिवीगाळ करतात.अशाप्रकारचे विडीओ प्रसारित झाले आहे की,ज्यामध्ये त्यांच्या घराचा शेवटपर्यंत निषेद करण्यात येईल व विरोध करण्यात येईल असा गावातील काही समाजकंटकानी एकप्रकारे निर्धार केला आहे.

जर असे काही झाल्यास तर केवळ जातीमुळे त्या परिवाराला गावातून बेदखल करण्याची एकप्रकारे भीती निर्माण झाली आहे. त्यांनी वारंवार पोलीस यंत्रणेला तक्रार देवूनही त्याचा काही फायदा झाला नाही. व त्यांना न्याय मिळाला नाही. त्यामुळे ते कुटुब एकाकी पडले आहे.याकरिता आज राष्ट्रिय चर्मकार महासंघातर्फे आज जिल्हाधिकारी व ग्रामीण पोलिस अधिक्षक यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले.यावेळी रा.का.सदस्य शामभाऊ आकोडे, जिल्हाध्यक्ष निलेश जामठे,जिल्हा महासचिव सारंगधर भामोदे,जिल्हा कार्याध्यक्ष जगदेव रेवसकर,गठाई कामगार उपाध्यक्ष दिलीप वाजगे,सामाजिक कार्यकर्ते प्रमोद इंगळे,निलेश रावळे,महेंद्र बोडखे आदिसह पदाधिकारी उपस्थित होते.

# येवदा सरपंच पदावर पुन्हा प्रतिभा माकोडे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९दर्यापूर**

येवदा ग्रामपंचायत जिल्ह्यामध्ये बहुचर्चित असलेली ग्रामपंचायत येथील सरपंच प्रतिभा माकोडे मागच्या महिन्यात दोन प्रकरणांमध्ये सरपंच पदावरून अपात्र झाल्या होत्या. तेव्हा विरोधकांनी फटाक्यांची आतषबाजी करून आपला आनंद व्यक्त केला होता; परंतु मंत्रालयातून या प्रकरणाला स्थगिती मिळाल्यामुळे ग्रामपंचायतीमध्ये सरपंच पदावर परत एकदा मोठा बदल झाला.

सरपंच माकोडे यांना विभागीय आयुक्त कार्यालयाच्या आदेशानुसार २२ जानेवारी २०२५ रोजी सरपंच पदावरून अपात्र घोषित करण्यात आले होते. परंतु, उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अपात्र घोषित झाल्यापासून त्यांना तीन आठवड्याची मुदतवाढ मिळाली होती. त्यांची ही मुदत दिनांक १२ फेब्रुवारीला संपल्याने ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमानुल्ला खां दिलावर खां यांना सरपंचपदाचा प्रभार सोपविण्यात आला होता. त्यानंतर दुसऱ्या प्रकरणात २६ जानेवारीची ग्रामसभा न घेतल्याचा ठपका ठेवत जिल्हाधिकारी यांनी २४ फेब्रुवारीला सरपंच आणि सदस्यपदावरून अपात्र घोषित केले होते. त्यानंतर माकोडे यांनी विभागीय आयुक्तांच्या निर्णयाला मंत्रालयातून ७ मार्च रोजी स्थगिती मिळविली व दुसऱ्या प्रकरणात त्यांना ४ एप्रिल रोजी उच्च न्यायालयातून जिल्हाधिकारी यांच्या निर्णयालासुद्धा स्थगिती मिळविली. दोन्ही निलंबनाच्या आदेशाला स्थगिती मिळाल्याने प्रतिभा माकोडे ७एप्रिल रोजी सकाळी सरपंचाच्या आसनावर स्थानापन्न झाल्या.